७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. २३ जून २०२६

www.dainikesandhya.com    www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १७८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# महायुतीचा १६ जागांवर विजय

## नाशिकमध्ये गोकुळ गितेंचा शिवसेनेला धक्का; महाविकास आघाडीचा सुपडा साफ

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राच्या विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीचा आज २२ जून रोजी निकाल लागला. या निकालात सत्ताधाऱ्यांच्या महायुतीने ऐतिहासिक घोडदौड घेतली आहे. राज्यातील १७ विधान परिषद जागांपैकी तब्बल १६ जागांवर महायुतीच्या उमेदवारांचा दणदणीत विजय झाला आहे, तर फक्त एक जागेवर अपक्ष उमेदवाराने बाजी मारली आहे.

विधान परिषदेच्या या जागांसाठीचे मतदान १८ जून रोजी पार पडले होते. एकूण १७ जागांपैकी ६ जागांवर महायुतीने यापूर्वीच बिनविरोध विजय मिळवला होता. उर्वरित ११ स्थानिक स्वराज्य संस्था मतारसंघांच्या निकालांनी महायुतीचे वर्चस्व अधिक स्पष्ट झाले.





या विजयात भाजपने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) यांनाही यश मिळाले आहे.

विरोधकांच्या महाविकास आघाडीला (काँग्रेस, शिवसेना उद्धव गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट) या निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे. महाविकास आघाडी या निवडणुकीत एकही विजय मिळवू शकली नाही, तर सर्व जागांवर पराभव पत्करावा लागला आहे.

राज्यभरात महायुतीची आघाडी असताना नाशिक स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून धक्कादायक उलटफेर झाला आहे. नाशिकमधून भाजपचे बंडखोर आणि अपक्ष उमेदवार गोकुळ गिते विजयी झाले आहेत. गिते ३५७ मतांनी विजयी झाले, तर महायुतीचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांना २४८ मते मिळाली. नाशिक निवडणुकीच्या मतमोजणीदरम्यान मोठा हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. निवडणुकीतून माघार घेतल्याचे मानले जाणारे गोकुळ गिते यांनी गनिमी कावा टाकत नरेंद्र दराडेंचा पराभव करून विजय मिळवला. गितेंच्या विजयामुळे एकनाथ शिंदेंच्या शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का बसला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीने विधान परिषदेतही आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. या विजयासोबतच विधान परिषदेत महायुतीची संख्या अधिक वाढली आहे, ज्यामुळे राज्यातील सत्ताधारी गटाची पायाभरणी अधिक मजबूत झाली आहे.

## आमदारकी खासदारकीसाठी ठाकरेंकडे गेलो नव्हतो, मला त्यांनीच बोलावलेलं

मुंबई (दै. संध्या)

ठाकरेंच्या शिवसेनेतून बंडखोरी करत संजय जाधव, संजय दिना पाटील, संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर, भाऊसाहेब वाकचौरे आणि ओमराजे निंबाळकर आज एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिंदेंच्या शिवसेनेत दाखल झाले. या पक्षप्रवेशानंतर संजय दिना पाटील यांनी त्यांची भूमिका मांडली. मी त्यांच्यासोबत राहावं असं त्यांना वाटत नाही. मी सर्वांच्या समोर जाऊन भेटतो. ते उभे राहिल्यास 10 लोक आहेत, मी गेल्यास 100 लोक उभे राहतात. मला उद्धव ठाकरे यांनी स्वत: बोलावलं होतं, मी त्यांच्याकडे पक्षात घ्या म्हणून गेलो नव्हतो, मला आमदारकी, खासदारकी द्या म्हणून गेलो नव्हतो. 2014 ला प्रताप सरनाईक एबी फॉर्म घेऊन आले होते. मी त्यांच्याकडे आमदारकी, खासदारकी द्या म्हणून गेलो नव्हतो, अशा शब्दात संजय दिना पाटील यांनी खदखद व्यक्त केली. त्या पक्षात मी कार्यकर्त्यांसाठी गेलो होतो,असं संजय दिना पाटील म्हणाले. विभागप्रमुख माझ्या कुटुंबावर जात होता,



■ संजय दिना पाटील यांची खदखद

असा पलटवार संजय दिना पाटील यांनी केला. 2004, 2009 मध्ये संजय राऊत, सुनील राऊत यांनी मदत केली होती, असं संजय दिना पाटील म्हणाले. उद्धव ठाकरे काल मतदारसंघात आले हेच जर अगोदर आले असते तर हा प्रॉब्लेम झाला नसता. मला ज्या व्यक्तीबरोबर प्रॉब्लेम होता त्याला बोलावलं असतं तर ही स्थिती झाली नसती. मी जर गेलो नसतो तर कोरम पूर्ण झाला नसता. मला बोलावून घेतलं असतं, हे झालं नसतं. मला ज्या व्यक्तीनं शिव्या दिल्या, त्याला माफी मागायला लावली असती तर हे झालंच नसतं, असा दावा संजय दिना पाटील यांनी केला.

## ५ जुलैपासून आमरण उपोषणाला बसणार, फडणवीस सरकारला इशारा

### फुटीर खासदारांवरही भडकले अण्णा हजारे

मुंबई (दै. संध्या)

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी फडणवीस सरकारला इशारा दिला असून 5 जुलै रोजी आपण आमरण उपोषण करणार असल्याचं त्यांनी म्हटलंय. माहिती अधिकार कायद्यात (RTI) 12 जून 2026 रोजी लागू करण्यात आलेल्या नव्या नियमांविरोधात अण्णा हजारे यांनी आक्रमक भूमिका घेतली असून शासनाने हे बदल पूर्ववत न केल्यास आपण उपोषण करणार असल्यावर ठाम असल्याचं त्यांनी म्हटले. त्यातच, ठाकरेंच्या शिवसेना पक्षातील खासदारांनी आज एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर अण्णांनी संतप्त प्रतिक्रिया दिली. मला समाजासाठी काहीतरी करायचे आहे, तो पक्ष बदल करत नाही, असे म्हणत फुटीर खासदारांवर निशाणाही साधला. माहिती अधिकार कायद्यात राज्यातील फडणवीस सरकारने काही बदल केले असून माहिती अधिकार मागणाऱ्या कार्यकर्त्यांना आता माहितीच्या प्रतिसाठी शुल्कवाढ करण्यात आली आहे. यासह, एकूण 12 बदल



करण्यात आले असून त्याविरुद्ध अण्णा हजारे यांनी आपली भूमिका मांडली. शुल्कवाढ, ओळखपत्राची सक्ती आणि "एक विषय–एक अर्ज" यांसारख्या तरतुदींमुळे माहितीचा अधिकार कमकुवत होत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवत हे नियम तातडीने रद्द करण्याची मागणी त्यांनी केली.. दरम्यान मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांच्याशी चर्चा झाली, दोन दिवसांनी ते आपल्याला भेटायला येणार आहेत, त्यांनी सकारात्मक निर्णय घेतला तर ठीक अन्यथा 5 जुलैपासून राळेगणसिद्धी येथील यादव बाबा मंदिरात बेमुदत उपोषण सुरू करण्याचा इशाराही अण्णांनी दिला आहे.

## उद्धव ठाकरेंचे ६ खासदार शिंदेंच्या शिवसेनेत

मुंबई (दै. संध्या)

शिवसेनेच्या परिवारामध्ये सहा नवीन खासदार सामील झाले असून त्यांचा योग्य तो सन्मान केला जाईल, त्यांच्याकडे कधीही दुर्लक्ष होणार नाही याची काळजी घेतली जाईल, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. या खासदारांच्या विश्वासाला तडा कधीही जाऊ देणार नाही, असंही ते म्हणाले. केंद्राशी निगडित प्रश्न असतील वा राज्यातील प्रश्न, कुठेही अडवणूक होणार नाही असा शब्द यावेळी एकनाथ शिंदे यांनी दिला.

ही सगळी ताकद एकत्र आल्यानंतर आपली शिवसेना अधिक भक्कम होईल असंही ते म्हणाले. ऑपरेशन टायगर आता फुलप्रूफ सक्सेस झालं आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले. यासंबंधित सर्व कायदेशीर गोष्टी आम्ही केल्या आहेत, असंही शिंदे म्हणाले. ठाकरेंची साथ सोडलेल्या सहा खासदारांनी यावेळी शिंदेंच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

उद्धव ठाकरेंची साथ सोडलेल्या सहा खासदारांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. हे सहा जण खऱ्या शिवसेना परिवारात सामील झाले, याबद्दल आपण त्यांचे अभिनंदन करतो असं एकनाथ शिंदे म्हणाले.चार वर्षांपूर्वी आपण



शिवसेना वाचवण्यासाठी, धनुष्यबाण वाचवण्यासाठी उठाव केला. आता हा लढा दुसऱ्या टप्प्यात पोहोचला आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

संजय पाटील हा जनतेशी जोडलेला, ग्राऊंड लेव्हलवर काम करणारा कार्यकर्ता आहे. संजय दिना पाटील हा खरा दिनांचा कैवारी असून दोस्ती जपणारा आहे. ओमराजे हे त्यांच्या मनाचे राजे आहेत. पण त्यांनी मनात निश्चय केला आणि ते आपल्यासोबत आले. आपल्या कार्यकर्त्यांशी चर्चा करून त्यांनी विकासासाठी, न्यायासाठी आपली साथ दिली. काही लोकांनी त्यांना हिणवलं, त्यांना रील स्टार म्हणाले. पण ओमराजे हे रियल स्टार आहेत.

संजय देखमुख हे उत्तम असून त्यांना अधिक उत्तम काम करायचं असल्याने ते आपल्याकडे आहे. नागेश पाटील आष्टीकर हे अत्यंत चांगले आहेत. भाऊसाहेब वाकचौरे हे देखील असेच कार्यकर्ते आहेत.

हे सर्व खासदार मतदारसंघातील विकासासाठी आपल्याकडे आले आहेत. 2022 साली बाळासाहेबांची विचारधारा सोडून दुसरा विचार आला त्यावेळी आम्ही उठाव केला. त्यावेळी आपल्यासोबत आलेले 40 आमदार परत निवडून येणार नाहीत असं म्हटलं जायचं. परंतु 40 चे 60 आमदार निवडून आले. चांदा ते बांदापर्यंत शिवसेना मोठी झाली. आमची नीती स्पष्ट होती, विचारधारेला घेऊन आम्ही पुढे गेलो.

आता आपल्या या कामात सहा खासदार सामील झाले आहेत. या सहा लोकांची ताकद, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमुळे शिवसेना आणखी बळकट होईल. या खासदारांच्या मतदारसंघातील विकासकामं, त्याच्या अडचणी सोडवण्यात येतील. मी दिलेला शब्द पाळतो, त्यामुळे एकनाथ शिंदेंवर विश्वास ठेवतात.

■ सर्व खासदारांचा सन्मान राखू, निधी कमी पडू देणार नाही, एकनाथ शिंदेंची ग्वाही

भास्कर जाधव यांचा काल झालेला अपमान महाराष्ट्राने पाहिला, किती दिवस ते ठाकरेंसोबत राहतील माहीत नाही, कारण जाधव सहन करणार नाहीत, असे म्हणत भास्कर जाधव हेही लवकरच ठाकरेंची साथ सोडणार असल्याचे संकेत संजय शिरसाट यांनी दिले आहेत. संभाजीनगर-जालना महायुती विधानपरिषद निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला यावेळी, विविध प्रश्नांना उत्तरे दिली. महायुती म्हणून लढलो, विजयी झालो, याचा आनंद आहे, असेही त्यांनी म्हटले.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

### ढिंग-टांग




## कोण होता पारसमल जैन? जुन्या हत्याकांडामागे कोणाचे षडयंत्र

# डॉ. पाटील निर्दोष! कोणामुळे फिरला निकाल?

छ. संभाजीनगर (दै. संध्या)

धाराशिवच्या राजकारणावर प्रभाव टाकणाऱ्या पवन राजेनिंबाळकरांच्या हत्याकांडच्या निकालानंतर डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या विरोधात एक मोठे राजकीय षडयंत्र रचण्यात आले असल्याचा आरोप त्यांचे सुपूत्र राणाजगजीतसिंह पाटील यांनी केला. खटल्याची गुंफण माफीचा साक्षीदार पारसमल जैन याच्या भोवती रचण्यात आली होती. मात्र तोच अविश्वासार्ह असल्याची न्यायालयाची निरीक्षणं आहेत. या निकालपत्रात आणि साक्षीदारांच्या जबानीमध्ये तत्कालीन पोलीस उपायुक्त राकेश मारिया यांच्या भूमिकेवरही संशय व्यक्त होईल, अशी विधानं असल्याने धारशिवच्या राजकीय पटलावर जुन्या षडयंत्राचे नवे आरोप-प्रत्यारोप होतील, असे संकेत राजकीय गोटातून मिळत आहेत.

१९९१ मध्ये डॉ. पद्मसिंह पाटील राज्यात मंत्री असताना त्यांचे चुलत बंधू पवन राजेनिंबाळकर यांना त्यांनी राजकारणात आणले. त्यांना तेव्हाच्या महाराष्ट्र राज्य वीज महामंडळात सदस्य म्हणून नेमले. मग तेरणा सहकारी साखर कारखान्यावर संचालक आणि जिल्हा बँकेत संचालक म्हणून निवडून आणले.



डॉ. पाटील यांच्या आर्शीवादाने पवन राजेनिंबाळकरांची राजकीय कारकीर्द सुरू झाली आणि बहरली. २००२ पर्यंत सारे काही सुरळीत सुरू होते.

पुढे जिल्हा बँकेत ' होम ट्रेड ' नावाचा घोटाळा उघडकीस आला. जिल्हा बँकेचे अध्यक्ष म्हणून काम करणारे पवन राजे निंबाळकर यांना या प्रकरणात अटक करण्यात आली. पुढे तेरणा कारखान्यातील गैरव्यवहारही बाहेर आले. या प्रकरणातही पवन राजे निंबाळकर यांना अटक झाली. आणि पद्मसिंह पाटील आणि पवन राजेनिंबाळकर यांच्यामध्ये कटुता निर्माण झाली. दोन महिने कारागृहात काढल्यानंतर तेरणा कारखान्यावर सर्वसाधारण सभा बोलावण्यात आली. यात पवन राजेनिंबाळकरांनी डॉ. पद्मसिंह पाटील यांच्याविरुद्ध मोर्चा उघडला. या सभेत दगडफेकही झाली होती. पुढे पवन राजेनिंबाळकरांनी त्यांची तक्रार पोलीस ठाण्यात केली. अगदी पोलीस संरक्षण मिळावे अशी मागणीही पोलीस अधीक्षकांकडे केली. याच काळात तेरणा कारखान्यातील गैरव्यवहाराच्या तक्रारी समाज सेवक अण्णा हजारे यांनी केल्या होत्या. या तक्रारीच्या अनुषंगाने न्या. पी. बी. सावंत यांच्या उपस्थितीमध्ये एक आयोग नेमून चौकशी करण्यात आली. या प्रकरणातील बदनामी नंतर डॉ. पद्मसिंह पाटील यांना मंत्रिमंडळातून राजीनामा द्यावा लागला. यातून निर्माण झालेल्या कटुतेमधून डॉ. पद्मसिंह पाटील यांनी हत्येची सुपारी दिली असा आरोप होता. या आरोपातून डॉ. पद्मसिंह पाटील यांची आता निर्दोष मुक्तता करण्यात आली.

पारसमल जैन हा व्यावसायिक ठाणे जिल्ह्यातील पोलिसांचा एक खबरी म्हणून काम करत असे. राजस्थानच्या राजसंमंध जिल्ह्यातील पडसाली गावचा मूळ रहिवासी. डोंबिवलीमध्ये रहायचा. सोने, घड्याळ, मिठाईची दुकाने, मार्बल टाईल्स असे त्याचे व्यावसाय. पारसमल जैनला एचआयव्ही संसर्ग होता. त्याला उपचारासाठी आणि त्याच्या मुलीच्या लग्नासाठी पैशांची गरज होती. म्हणून त्याने आसवानी प्रकल्पात काम करणाऱ्या मोहन शुक्ल यास पैशांची मदत मागितली. ही मदत दिली जाईल पण त्याला मदत करताना अट टाकण्यात आली की, त्याने पवन राजेनिंबाळकर यांची हत्या करायची. असा तपास यंत्रणाच्या हत्येच्या कटातील दावा. मोहन शुक्ल हे पारसमल जैन यास सतीश मंदाडे यांच्याकडे घेऊन गेले. त्यांनी जैन यास एक लाख रुपये दिले. पवन राजेनिंबाळकर यांचे लातूर व उस्मानाबादमधील त्यांचा वावर आणि त्यांच्याबाबतची इतर माहिती दिली. जैन हा पोलीस खबरी असल्याने त्याच्याकडे रिव्हॉल्वर होते. पण वारंवार शोध घेऊनही जैन यास पवन राजे सापडले नाहीत. मग एकट्याचे हे काम नाही असे सांगत पारसमल जैन पुन्हा सतीश मंदाडे यांच्याकडे आला. आता हत्येसाठी २५ ते ३० लाख रुपये लागले तरी चालतील असे सांगण्यात आले. या हत्येसाठी उत्तरप्रदेशच्या कैलाश यादव यास हत्यार आणि रिव्हॉल्वर चालविणारे आणा अशी जबाबदारी देण्यात आली.

## भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या हॉटेल मालकालाच संपवलं

### केजमध्ये तणाव, ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

मुंबई (दै. संध्या)

भांडणात मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या हॉटेल चालकाचा चाकूने भोसकून खून झाल्याची धक्कादायक घटना बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात घडली आहे. विलास घुले असे मृत हॉटेल चालकाचे नाव आहे. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात उपचारादरम्यान काल दुपारी त्यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर केज परिसरात तणाव निर्माण झाला असून, आरोपींना तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात ठिय्या मांडला. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोन वेळा रस्ता रोको आंदोलन केल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली.

दरम्यान, या प्रकरणात नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, यातील तीन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दरम्यान उर्वरित आरोपींच्या अटकेच्या मागणीसाठी सोमवारी देखील बीड केज राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. घटना 20 जून रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास कदमवाडी फाट्यावरील 'हॉटेल गावकरी'समोर घडली. हॉटेल चालक विलास घुले, आकाश चाळक, उमेश



माने आणि स्वयंपाकी गणेश शुक्ला हे हॉटेलवर बसलेले असताना पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओमधून बाबासाहेब कदम, मंगेश कदम, रामेश्वर गायकवाड आणि त्यांचे इतर नातेवाईक तेथे आले. अनैतिक संबंधाच्या संशयावरून बाबासाहेब कदम यांनी उमेश माने याला मारहाण करण्यास सुरुवात केली. जीव वाचवण्यासाठी उमेश माने केजच्या दिशेने पळाला, त्याला वाचवण्यासाठी नितीन घुले आणि हॉटेल मालक विलास घुले हे देखील त्याच्या मागे धावले. दरम्यान, बाबासाहेब कदम, मंगेश कदम, रामेश्वर गायकवाड, शुभम गायकवाड, भैय्यासाहेब गायकवाड,अजय उर्फ बंकट कदम, नवनाथ कदम, दीपक कदम आणि संतोष कदम यांनी रेणु बारसमोरील बंद समर्थ बिअर बारजवळ नितीन आणि विलास घुले यांना अडवले. सर्वांनी मिळून विलास घुले यांना मारहाण सुरू केली. याच वेळी बाबासाहेब कदम यांनी सोबत आणलेला चाकू काढून नितीन घुले यांच्या डोळ्यासमोरच विलास घुले यांच्या पोटात खुपसला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या विलास घुले यांना तात्काळ केज येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. तेथून पुढील उपचारासाठी त्यांना अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी नऊ जणांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेनंतर संतप्त नातेवाईक व स्थानिकांनी केज पोलीस स्टेशनसमोर आणि छत्रपती शिवाजी महाराज चौकात ठिय्या देत आंदोलन केले. दरम्यान रस्ता रोकोमुळे काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. तणावपूर्ण परिस्थिती लक्षात घेऊन पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला.

## संपादकीय

# ..आणि तिथूनच सुरू होते दूध भेसळीची जीवघेणी साखळी

महाराष्ट्रात दूध भेसळ हा सध्या चर्चेचा विषय आहे. एक बदल केला की, दुसरी गोष्ट बिघडते. ती लपवण्यासाठी आणखी काही घालावे लागते आणि शेवटी दूध हे नैसर्गिक अन्न न राहता ते रसायनाचा प्रोजेक्ट बनते. साधारणत: दुधात फॅट व 'एसएनएफ' (सॉलिड नॉट फॅट) यांचे प्रमाण अनुक्रमे ४ व ८.५ टक्के असते. समजा १०० लिटर दुधात २० लिटर पाणी टाकले, तर हे प्रमाण अनुक्रमे ३.३ व ७ टक्के होते. कारण पाणी घातल्यामुळे त्याची तीव्रता कमी होते. समस्या इथून सुरू होते. कारण डेअरीला दूध घालताना फॅट किमान साडेतीन व एसएनएफ साडेआठ टक्के असावे अशी अट ठेवतात. पाणी घातल्यामुळे हे घटक कमी पडले तर दूध नाकारले जाऊ शकते.

इथून पुढे सुरू होते भेसळीची साखळी. पाणी घातल्याने दूध पातळ दिसते म्हणजे त्याची व्हिस्कॉसिटी (चिकटपणा) कमी होते. मग काही लोक त्यात स्टार्च घालतात. त्यामुळे दुधाला कृत्रिम घट्टपणा येतो. आता दुसरी समस्या. पाणी घातल्यावर दुधाची घनता कमी होते व घनता मोजणारे लॅक्टोमीटर ते ओळखू शकते; पण दुधात घनपदार्थ (स्टार्च) किंवा साखर घालतात. त्यामुळे साखर विरघळून घनता वाढते. त्यामुळे लॅक्टोमीटरला दूध पुन्हा सामान्य वाटू शकते.

तिसरी महत्त्वाची समस्या. पाणी घातल्यामुळे 'एसएनएफ' कमी होते. यात प्रोटिन महत्त्वाचे असते. प्रोटिनमध्ये नायट्रोजन जास्त असते. एसएनएफ मोजणारे मशीन प्रोटिन मॉलेक्यूल न मोजता ते प्रोटिनमधील नायट्रोजन मोजते. जास्त नायट्रोजन म्हणजे जास्त प्रोटिन. इथे लूपहोल आहे. युरियामध्ये खूप जास्त नायट्रोजन असतो. म्हणून पाणी घातलेल्या दुधात काही लोक युरिया घालतात. त्यामुळे खरे प्रोटिन न वाढता फक्त नायट्रोजन वाढतो. मशीन म्हणते प्रोटिन ठीक आहे. म्हणजे प्रोटिन वाचनात कृत्रिम वाढ दिसते. पाणी घातल्यामुळे फॅट कमी लागते. ग्राहक म्हणतो दूध पातळ आहे. मग काही लोक त्यात डिटर्जंट वापरतात. हे ऐकायला विचित्र वाटते; पण डिटर्जंट फेस आणतो व एक स्निग्धमय टेक्स्चर तयार होते. आता समजा दूध खराब व्हायला लागले. म्हणजे जिवाणू दुधातील लॅक्टोज खाऊन लॅक्टिक ॲसिड तयार करतात. अशा दुधाची आम्लता वाढते. डेअरी ते नाकारते. अशा वेळी त्यात खाण्याचा सोडा टाकतात. सोडा दुधातील जास्तीचे आम्ल निष्प्रभ करतो. म्हणजे दुधाचा आंबटपणा कमी करून ते चांगले असल्याचा आभास केला जातो. उन्हाळ्यात ट्रान्सपोर्टला उशीर झाला. गारवा निर्माण साखळी नसेल तर जिवाणूची वाढ होते. अशा वेळी दूध खराब होऊ नये म्हणून त्यात हायड्रोजन पेरॉक्साइड किंवा फॉर्मलीनसारखी रसायने वापरली जातात. म्हणजे एक भेसळ दुसरी भेसळ निर्माण करते. खरे तर शेतकऱ्याचे दूध तुलनेत जास्त प्रामाणिक असू शकते. मग त्यात फॅट कमी जास्त होईल. कधी ते पातळ वाटेल; पण ते नैसर्गिक असू शकते. कारण दूध फॅक्टरीमध्ये तयार होत नाही. गाईचे खाणे, पाणी पिणे, हवामान, स्थानिक परिस्थिती, हिरवा चारा, ताण, यावर गाईचे दूध बदलते. म्हणून नैसर्गिक दूध रोज एकसारखे नसते. ग्राहकाची मोठी समस्या म्हणजे त्याला रोज एकसारखे दूध हवे असते. म्हणजे दुधाचा रंग, घट्टपणा, चव, एकसारखी हवी असते; पण निसर्ग प्रमाणित नसतो. फॅक्टरी प्रमाणित असते. फॅट कमी झाले तर प्रश्न, एसएनएफ कमी झाले तर प्रश्न, आम्लता वाढली तर प्रश्न. मग रसायनशास्त्रज्ञ सुरू होते व दुधात भेसळ वाढते. त्यामुळेच पुढच्या काळात लोक पुन्हा स्थानिक दूध व्यवस्थेकडे जातील, असे वाटते. शेतकऱ्याकडून थेट दूध घेणे, जनावरे पाळणे आणि थोडे नैसर्गिक फरक सहन करणे, हा जास्त टिकाऊ मार्ग असू शकतो.

## संस्कृत सुभाषित

शुकवद् भाषणं कुर्याद्, बकद्ध्यानमाचरेत्।
अर्जवच्चर्वणं कुर्याणं, गजवत्स्नानमाचरेत्।।

पोपटासारखे (स्पष्ट) बोलावे, बगळ्यासारखे ध्यान लावावे, शेळी व बकरीप्रमाणे चर्वण करावे तसेच हत्तीप्रमाणे (मनसोक्त) स्नान करावे.

## गुरु वचन

### निरपेक्षी-सदासुखी !

जगज्जेता सिकंदर (अलेक्झांडर) बादशहाच्या समकालीन असणाऱ्या डायोजिनीस या ग्रीक तत्त्वचिंतकाची ही गोष्ट. तो निसर्गापासून धडा घेणारा मुनीच होता. 'माणसाने कमीत कमी गरजा ठेवाव्यात, म्हणजे तो सुखी होतो' असे त्याचे तत्त्व होते. कुत्रा कसा मनमुराद भटकतो, मिळेल ते खातो, ना घर ना दार, ना कपडा ना लत्ता; तसेच माणसाने राहावे असे तो सांगायचा म्हणून त्याच्या पंथाला उपहासाने 'सिनीक' (कुत्र्यांचा) पंथ म्हणू लागले. त्याच्या निधनानंतर नागरिकांनी त्याच्या कबरीवर कुत्र्याचीच प्रतिमा बसवली. फक्त तो एक सोटा जवळ बाळगत असे नि कमरेस पंचा. पाणीसुद्धा ओंजळीने प्यायचा. तो दिवसासुद्धा हाती पलिता घेऊन फिरायचा नि कुणी विचारले तर सांगायचा, 'सच्चा माणसाच्या शोधासाठी हा दिवा घेऊन फिरतो आहे' सिकंदर बादशहा त्याची कीर्ती ऐकून भेटायला आला. 'मी बादशहा सिकंदर, हवं ते माग, मी देईन' असे त्याने सांगितले. डायोजिनीस म्हणाला, 'माझं ऊन अडवून उभा आहेस तेवढा बाजूला उभा राहा. मला दुसरं काही नको.'

कथा उपदेश : नि:स्पृहाला जग तृणवत् वाटते.

'ज्योत' म्हटलं की ती झंझावातात विझणारच असं माणलं जातं. सगळ्या ज्योती विझतात. विझत नाही तो प्रकाशाचा धर्म. कायम उरतो तो प्रकाश. आणि ज्योतीचा जय होणार नाही असं कशावरून? आयुष्य केवळ ज्योतीला असतं असं नाही, झंझावातालाही असतं.

## उपदेशकथा

### कुशल मार्गदर्शन

एका प्रयोगशाळेत काही विद्यार्थी प्रयोग करत होते. यावेळी दोन विद्यार्थ्यांकडून मोठी चूक झाली. त्यांना वाटले की, आता त्यांना कठोर शिक्षा मिळेल. प्रयोगशाळा त्यावेळी प्रसिद्ध वैज्ञानिकाने काही दिवसांपूर्वीच सुरु केली होती. दोन्ही विद्यार्थी घाबरत-घाबरत त्यांच्याजवळ गेले. वैज्ञानिकाने त्यांना घाबरलेले पाहून विचारले, काय झाले? यावर एक विद्यार्थी घाबरत-घाबरत म्हणाला, सर इलेक्ट्रिक मिटर खराब झाले आहे. यामुळे त्याच्यात खूप जास्त करंट पसरला आहे. हे ऐकून वैज्ञानिक सुन्न झाला. नंतर त्याने स्वत:ला सावरले आणि म्हणाला, अरे फक्त एवढ्या छोट्या गोष्टीसाठी तुम्ही दोघे एवढे परेशान आहात. विद्यार्थी जेव्हा प्रयोग करतात तेव्हा अशा गोष्टी घडतच असतात. जर विद्यार्थ्यांनी चूका केल्या नाहीत तर ते शिकतील कसे? परंतु भविष्यात प्रयोग करताना मात्र अवश्य सावधानी बाळगायला हवी. ज्यामुळे अशा प्रसंगापासून वाचता येईल. विद्यार्थ्यांनी वैज्ञानिकाचे म्हणणे ऐकूल्यानंतर वैज्ञानिकाप्रती त्यांच्या मनात आदर निर्माण झाला. तथापि, जी चूक या दोन्ही विद्यार्थ्यांकडून झाली होती. त्यामुळे एका खूप महागडे आणि महत्त्वाचे यंत्र पूर्णपणे जळाले होते आणि ते यंत्र सध्या बाजारात उपलब्ध नव्हते. एवढेच नव्हे तर ते यंत्र जळाल्यामुळे अनेक महत्त्वपूर्ण प्रयोगही थांबले होते. परंतु वैज्ञानिक या नुकसानावर न चिडले न त्यांनी दोन्ही विद्यार्थ्यांवर राग व्यक्त केला. तर दोन्ही विद्यार्थ्यांना भयमुक्त केले. त्यानंतर ज्यांनीही हा प्रसंग ऐकला. त्यांनी वैज्ञानिकाची स्तुती केली.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:हस्त ११:५३:४० |
| २३ जून २०२६ | योग:वारीयन १०:१२:५० |
| मंगळवार | करण:कौलव १६:३९:५६ |
| विक्रम संवत्- २०८२ | करण:तैतिल |
| निज ज्येष्ठ शीर्ष शके | २९:२२:३९+ |
| संवत्- १९४८ | सूर्य:मिथुन |
| संवत्सर - पराभवनाम | चन्द्र:कन्या |
| अयन- दक्षिणयन | हिजरी सन् - १४४८ |
| मास- निज ज्येष्ठ | मुस्लिम मास - मोहरम |
| ऋतु- सौर ग्रीष्म | तारीख - ७ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:नवमी १६:३९:५६ | शुभ दिवस |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९८९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | | | | | 2 | | | 5 |
| 6 | | 8 | | 1 | 5 | | 3 | 9 |
| 5 | | | | 9 | | 1 | | |
| | | 6 | 1 | 7 | | | | 8 |
| 7 | | | | | | | | 2 |
| 9 | | | | 4 | 8 | 6 | | |
| | | 7 | | 6 | | | | 1 |
| 8 | 9 | | 7 | 2 | | 5 | | 3 |
| 1 | | | 8 | | | | | 4 |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९८८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 6 | 4 | 7 | 8 | 3 | 1 | 9 | 2 |
| 8 | 1 | 9 | 4 | 6 | 2 | 5 | 3 | 7 |
| 2 | 3 | 7 | 9 | 1 | 5 | 6 | 8 | 4 |
| 1 | 7 | 8 | 6 | 5 | 4 | 9 | 2 | 3 |
| 3 | 4 | 5 | 2 | 9 | 8 | 7 | 6 | 1 |
| 9 | 2 | 6 | 3 | 7 | 1 | 8 | 4 | 5 |
| 6 | 5 | 2 | 1 | 4 | 9 | 3 | 7 | 8 |
| 4 | 9 | 1 | 8 | 3 | 7 | 2 | 5 | 6 |
| 7 | 8 | 3 | 5 | 2 | 6 | 4 | 1 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६८३ – पेनसिल्व्हेनियात विल्यम पेनने स्थानिक लेनी लेनापे जमातीशी मैत्री करार केला.
- १८६५ – अमेरिकन गृहयुद्ध – ओक्लाहोमातील फोर्ट टौसन येथे दक्षिणेच्या उरल्यासुरल्या सैन्याने शरणागती पत्करली.
- १८९४ – आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीची स्थापना.

### राष्ट्रीय

- १७५७ – प्लासीची लढाई – रॉबर्ट क्लाईव्हच्या ३,००० ईस्ट ईंडिया कंपनीच्या सैनिकांनी सिराज उद दौलाच्या ५०,००० बंगाली सैनिकांना हरवले. ईस्ट ईंडिया कंपनीच्या भारतावरील वर्चस्वाची ही मुहुर्तमेढ होती.

### जन्म

- ००४७ – फेरो टॉलेमी पंधरावा याचा जन्म.
- १७६३ – जोसेफिन, फ्रांसची साम्राज्ञीचा जन्म.
- १८९४ – एडवर्ड आठवा, इंग्लंडचा राजाचा जन्म.
- १९१० – गॉर्डन बी. हिंकली, मोर्मोन चर्चचा अध्यक्ष याचा जन्म.
- १९१२ – ॲलन ट्युरिंग, इंग्लिश गणितज्ञ व संगणकशास्त्रज्ञ याचा जन्म.
- १९१६ – लेन हटन, इंग्लिश क्रिकेटपटूचा जन्म.
- १९३६ – कॉस्टास सिमिटिस, ग्रीक पंतप्रधान यांचा जन्म.
- १९३७ – मार्टी अहतीसारी, फिनलंडचा राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.

### निधन

- ००७९ – व्हेस्पासियन, रोमन सम्राट यांचे निधन.
- १५१६ – फर्डिनांड दुसरा, अरागॉनचा राजा यांचे निधन.
- १८९१ – विल्हेल्म एडवर्ड वेबर, जर्मन भौतिकशास्त्रज्ञ यांचे निधन.

## : SMS :

Breaking News:
Indian Top Actress
"Katrina Kaif" Died
in New York.
Aby Film NEWYORK
Main Yaar.
Aise thorri Marny
Donga Tumhari
Bhabhi Ko

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३६.४ | २६.९ |
| अहमदनगर | ३५.९ | २४.७ |
| अकोला | ४०.७ | ३१.७ |
| अमरावती | ४१.७ | ३२.२ |
| बीड | ४४.७ | ३३.४ |
| भंडारा | ४१.२ | ३१.८ |
| बुलढाणा | ४२.४ | ३२.२ |
| चंद्रपूर | ४४.३ | ३४.९ |
| चेन्नई | ४३.५ | २६.६ |
| नवी दिल्ली | ४२.४ | ३२.५ |
| धुळे | ४०.२ | २७.२ |
| गोंदिया | ४० | ३२.१ |
| जळगाव | ४१ | ३०.९ |
| कोल्हापूर | ३६.२ | २३.२ |
| लातूर | ३८.१ | २८.५ |
| मुंबई | ३९.२ | ३४.२ |
| नागपूर | ४१.२ | ३१.२ |
| नांदेड | ४१.६ | ३२.२ |
| नंदूरबार | ३७.१ | ३० |
| नाशिक | ३६.१ | २४.७ |
| पुणे | ३३.६ | २३.३ |
| पंढरपूर | ३८.२ | २८.२ |
| सातारा | ३६.६ | २१.९ |
| सांगली | ३६.६ | २३.९ |
| सोलापूर | ३८.९ | २८.६ |
| वर्धा | ४३.४ | ३२.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व
नवीन योजनेचा शुभारंभ होण्याचा योग आहे. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

**तुळ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. मित्र, सहकारी यांची मदत मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा :पूर्व
आरोग्य चांगले राहील. आर्थिक योग मध्यम आहेत. व्यापारिक प्रकरणात जबाबदारी वाढणार आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
आपण केलेल्या कामाची सुरूवात चांगली होईल. साहसीवृत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व
चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**धनु :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा : पश्चिम
जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक समस्या येऊ शकते.

**कर्क :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व
आज आपल्या कामात आपल्याला उत्साह वाटणार आहे. बुद्धीचा उपयोग करून पैसा गुंतवणूक करा.

**मकर :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पश्चिम
मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नोकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल.


**सिंह :** शुभ रंग:लाल,शुभ दिशा: दक्षिण
केलेल्या कामाचे चीज होईल. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल.

**कुंभ :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम
महत्वपूर्ण व्यक्तिंचा संप येईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**कन्या :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम
आपण घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक प्रसिद्धी मिळेल.

**मीन :** शुभ रंग : काळा,शुभ दिशा:पूर्व
आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. आर्थिक फायदा होईल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९८९



### आडवे शब्द

१. सात वारांना या सात ग्रहांची नावे आहेत
९. मावा
१०. बिलामत, संकट (ला.)
११. पतन
१३. स्तुती, प्रशंसा
१५. निदान एवढे तरी!
१७. चोरटा मार्ग
१९. घर
२०. जन्मदात्री
२१. महाशिवरात्रीचे फळ
२२. मर्यादा, सीमा
२३. औदार्य, देण्याची इच्छा
२४. विद्या
२५. बोच, खंत
२७. भाकरी
२९. फणसाची एक जात
३१. सुंदर स्त्री, अर्धांगी
३२. आतापर्यंत
३४. मातीचा कण
३५. समुद्रकिनारा
३६. अखंडित प्रवाह
३८. पायऱ्यांची विहीर
३९. सहाय्य
४०. झुकलेला, नम्र
४१. ईदच्या दोन प्रकारांपैकी एक
४२. काथ्याकूट
४३. रोगप्रतिबंध द्रव
४४. संधी, मोकळीक
४५. मोठा नगारा
४६. शेवटचे बोट
४८. समुद्र
४९. खाज
५०. आचळ, सड
५४. भित्रा, घाबरणारा
५६. उगीच
५८. उत्सव, त्योहार
५९. किंमत
६०. आठवड्याचा सातवा भाग, इंद्र
६३. कोल्हापुरी दागिना, हिंदीत वाद्य
६४. चांदणी
६६. ईर्षा, बळ
६७. काळी मैना
६९. कापसाचे बीज
७१. अंगावरील केस
७३. मोटार
७५. फुरसत
७६. शहाणा, चलाख
७९. कागदाचे एक मोजमाप
८०. ओटा, पार
८१. कर नाही त्याला -- कशाला!
८२. लग्नातील वर

### उभे शब्द

१. पहारेकरी
२. लग्न
३. नंतर
४. स्वर्गातील गंगा
५. ठोसा
६. रसवंतीगृह
७. लटका राग, नाराजी
८. खरेदी
१२. हजार किलो
१४. सवाद्य मिरवणूक
१६. नकला करणारा
१७. पोथीचे वाचन
१८. डाक
१९. कलगीतुरा
२५. संतोष, तृप्ती
२६. मावळ्यांची गर्जना
२८. पाताळ
३०. सररसरीत
३३. नियमित उत्पन्नपेक्षा जास्त (कमाई)
३४. दात
३७. रात्रीचा पाऊस, एक पक्षी
३९. भ्रमर, भुंगा
४२. गालावरचा गोड खड्डा
४३. निकट, जवळ
४४अ. स्वाभिमान
४७. ललकारी, घोषणा
५१. ललाटलेख लिहिणारी
५२. नडल्याने अक्कल गहाण टाकणारा
५३. मोठा हातोडा
५५. प्रत्येक वर्षी
५७. व्यवसायनिमित्त बायकांचा हात धरणारा
५८. एकूणात मध्यम प्रमाण
६१. लाल फितीचा कारभार
६२. सवड, फुरसत
६५. शिल्लक, इतर
६७. उग्र, ताठर
६८. डोंगराचा तुटलेला भाग
७०. रत्न
७२. अचानक बरसणारा पाऊस
७४. सुंदर तरुणी
७७. अटीतील दुसरा शब्द
७८. खिल्ली, टिंगल

### जम्बो शब्दकोडे क्र. ९८८ चे उत्तर

आडवे उत्तर १.हस्तांदोलन ४.पारावार ७.सरसरीत १०.फारकत १२.वानर १४.रीत १७.माळी १८.पाळत १९.वात्रट २१.पारायण २२.पाप २३.कप २५.दास २६.वाखाणणी २७.स्तवनीय २९.मायबोली ३१.भाक ३२.यथार्थ ३३.बादल ३५.वाताहत ३९.बार ४०.मदार ४२.रामा ४३.पापा ४४.भडका ४६.कवायत ४७.मात्र ४८.लसलस ५०.वर ५१.रजा ५२.दानव ५४.वा ५५.माती ५६.पोक ५८.धनगर ५९.कसदार ६१.सकल ६२.वन्य ६४.साप ६५.कर्ण ६६.आसेतु हिमाचल ६९.जनक ७०.कौरव ७१.मान ७२.वचन ७३.भाट ७४.कमला ७५.कला ७७.तारस्वर ७९.रुप ८०.जननमरण ८१.तळ

उभे उत्तर : १.हजेरी २.दोरा ३.नफा ४.पाकळी ५.रात ६.रवाळ ७.सर ८.सर्वत्र ९.तप ११.रमा १३.नतमस्तक १५.तपास १६.हयगय १८.पापणी १९.वाचनीय २०.टक २२.पाणउतारा २४.पल्ला २५.दादा बाबा करणे २६.बाली २८.यथासंभव २९.माल ३०.बोगदा ३१.भात ३४.दरवाजा ३६.हमाल ३७.उपासमार ३८.काका ४०.मतदान ४१.रमावर ४३.पाल ४५.डरपोक ४९.सरस ५३.नगरसेवक ५७.कलकलाट ५८.धन्य ५९.कवच ६०.दारू ६१.सपक ६२.वर्ण ६३.म हिमा ६४.सान ६५.कटकट ६६.आर ६७.मानधन ६८.लवकर ६९.जनता ७०.कौलारू ७३.भारत ७६.लाज ७८.रक्षा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### जय भवानी मित्र मंडळातर्फे 640 गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

■ मागील २५ वर्षांपासून सातत्याने उपक्रम; माजी उपमहापौर प्रसन्न जगताप यांची प्रमुख उपस्थिती

पुणे (दैनिक संध्या) : श्री वेताळ बाबा मंदिर ट्रस्ट, जय भवानी मित्र मंडळ, जय भवानी नगर, जनता वसाहत यांच्या वतीने परिसरातील गरजू विद्यार्थ्यांसाठी वह्यावाटप उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ६४० गरजू विद्यार्थी-विद्यार्थिनींना वह्यांचे वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे, गेल्या २५ वर्षांपासून मंडळामार्फत हा सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. कार्यक्रमास पुण्याचे माजी उपमहापौर नगरसेवक प्रसन्न जगताप हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मित्रपरिवारातील कार्यकर्ते आकाश शेंडकर, रोहन बंगाल, हेमंत भाटी, अमोल हुंबरे, सोमनाथ सूर्यवंशी, आनंद भाटी, निवास गाडेकर, आकाश चव्हाण, नकुल बोंबले आदींनी परिश्रम घेतले. यावेळी माजी उपमहापौर नगरसेवक प्रसन्न जगताप म्हणाले, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. जय भवानी मित्र मंडळ गेली अनेक वर्षे गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत असून, हा उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी आहे. कार्यक्रम संयोजक किशोर ठाकूर म्हणाले, शिक्षणापासून कोणताही विद्यार्थी वंचित राहू नये, या उद्देशाने मंडळाच्या वतीने गेल्या २५ वर्षांपासून वह्यावाटप उपक्रम राबविला जात आहे. भविष्यातही सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.



### डॉ. के. एच. संचेती मेडी-रत्न पुरस्कार डॉ. कल्याण गंगवाल यांना जाहीर

■ डॉ. के. एच. संचेती मेडी-रत्न पुरस्काराचा पहिला मान डॉ. कल्याण गंगवाल यांना

पुणे (दैनिक संध्या) : मेडी-जैन डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने वैद्यकीय क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याचा गौरव करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या प्रतिष्ठेच्या 'डॉ. के. एच. संचेती मेडी-रत्न पुरस्कार' या पुरस्काराचा पहिला मान ज्येष्ठ फिजिशियन डॉ. कल्याण गंगवाल यांना जाहीर करण्यात आला आहे. मेडी-जैन डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. ज्योती संघवी, डॉ. जिग्नेश तासवाला आणि डॉ. पराग जैन यांनी याबाबत माहिती दिली. वैद्यकीय क्षेत्रातील दिग्गज व्यक्तिमत्त्व डॉ. के. एच. संचेती यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार सुरू करण्यात आला असून, आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत डॉ. कल्याण गंगवाल यांची पहिल्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. अनेक दशकांपासून त्यांनी रुग्णसेवा, वैद्यकीय क्षेत्रातील प्राविण्य आणि आरोग्य व्यवस्थेच्या उभारणीत दिलेले योगदान उल्लेखनीय मानले जाते. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन ५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.३० ते ९.०० वा संचेती हॉस्पिटल, छत्रपती शिवाजीनगर पुणे येथे करण्यात आले आहे. वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर, डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे. वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या पुरस्कारामुळे समाजाप्रती समर्पित सेवाभावाला नवी प्रेरणा मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

### द डान्स फाउंडेशनच्या 'जल्लोष 2026'ला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे (दैनिक संध्या) : द डान्स फाउंडेशन प्रस्तुत 'जल्लोष २०२६' हा वार्षिक सांस्कृतिक महोत्सव दिनांक १७ जून रोजी सायंकाळी ७ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. नृत्य, नाट्य आणि विविध कलाविष्कारांनी सजलेल्या या कार्यक्रमाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमामध्ये १९ आकर्षक सादरीकरणांद्वारे विविध वयोगटातील कलाकारांनी आपली कला सादर केली. शास्त्रीय, लोकनृत्य, बॉलिवूड, समकालीन नृत्यप्रकार तसेच नाटुकली ही सादर करण्यात आली. अंतर्नाद च्या विशेष मुलांनी सुंदर नृत्य सादर केले. मुलांच्या सादरीकरणानी उपस्थितांची मने जिंकली. मानव्य संस्थे कडून पण नृत्य सादर करण्यात आले ११ मुले आणि त्यांच्या सोबत सिनियर सिटीझन श्री शशांक वाघ आणि विश्राम कुलकर्णी यांनी ही नृत्याचे सादरीकरण केले. त्यांचे ही विशेष कौतुक झाले. कलाकारांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणासह उत्कृष्ट नियोजन, नेपथ्य, वेशभूषा आणि सादरीकरणाची गुणवत्ता यांचे विशेष कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध अभिनेते सौरभ गोखले उपस्थित होते. त्यांनी कलाकारांचे कौतुक करत द डान्स फाउंडेशनच्या कार्याला शुभेच्छा दिल्या. तसेच या कार्यक्रमात श्री चारुहास पंडित, श्री अमृत पुरंदरे , इव्हेंट स्पॉन्सर बारडेलो चे श्री मयूर हांडे, एम्बेलिर च्या सौ पूजा गोरे-सोमनी उपस्थित होते. द डान्स फाउंडेशनच्या संस्थापिका व नृत्यदिग्दर्शिका राधा पुरंदरे यांनी सर्व कलाकार, पालक, प्रशिक्षक, स्वयंसेवक, प्रायोजक आणि प्रेक्षकांचे आभार मानले. "जल्लोष हा केवळ कार्यक्रम नसून प्रत्येक विद्यार्थ्याच्या आत्मविश्वासाचा आणि कलाप्रवासाचा उत्सव आहे," असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामुळे उपस्थित प्रेक्षक, पालक आणि कला रसिकांकडून द डान्स फाउंडेशनवर कौतुकाचा वर्षाव झाला.

### इलेक्ट्रिक 'शिवाई' बसची अनेक गाड्यांना धडक, घटनास्थळावरचा VIDEO आला समोर

पुणे (दैनिक संध्या) : पुण्यात एसटी महामंडळाच्या इलेक्ट्रिक बसने अनेक गाड्यांना धडक दिल्याची घटना घडली आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जिवीतहानी झालेली नाही. मात्र काही जण किरकोळ जखमी झाल्याचे समजते. कासारवाडी मेट्रो स्थानकाजवळ हा अपघात घडला. शिवाई बसने मेट्रो स्थानकाच्या खाली चार ते पाच गाड्यांना धडक दिली. अपघाताच्या या घटनेनंतर रस्त्यावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. शिवाई बसने धडक दिल्यानं दुचाकींसह काही गाड्यांचं नुकसान झालं आहे. अपघातामुळे परिसरात मोठा आवाज झाल्यानंतर प्रवासी आणि स्थानिकांमध्ये गोंधळ उडाला. या अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अपघातग्रस्त वाहने रस्त्यावरून हटवण्यात आली आहेत.

# आत्मविश्वास मिळाल्यास ग्रामीण मुले यशाची उंच भरारी घेतील

पुणे (दै. संध्या)

■ 'लायब्ररी मॅन' प्रदीप लोखंडे

"ग्रामीण भागातील मुले ही निसर्गतःच विविध कलागुणांनी संपन्न असतात. मात्र, योग्य संधी न मिळाल्यामुळे किंवा त्यांच्यात काहीसा न्यूनगंड असल्यामुळे ती मुख्य प्रवाहाच्या बाहेर राहतात. या मुलांना प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची आज नितांत गरज आहे. एकदा का त्यांच्यात हा विश्वास जागवला, की ही मुले यशाची उत्तुंग भरारी घेतील. जीवनातील प्रत्येक गोष्टीकडे सकारात्मकतेने पाहायला शिका, सकारात्मकतेने काम करत राहा आणि कायम संवाद ठेवा, आपल्याला यश नक्कीच मिळेल," असे प्रतिपादन "लायब्ररी अँड पोस्टकार्ड मॅन' म्हणून ओळखले जाणारे व रूरल रिलेशनशिपचे संस्थापक प्रदीप लोखंडे यांनी केले.

'मानव्य' संस्थेच्या २९ व्या वर्धापन दिन सोहळ्यात ते मुख्य पाहुणे म्हणून बोलत होते. हा सोहळा रविवारी भूगाव येथील 'मानव्य गोकुळ' (माताळवाडी फाटा) संस्थेच्या आवारात अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष शिरीष लवाटे उपस्थित होते, तर व्यासपीठावर, सार्थ वेल्थ'चे संस्थापक अरविंद परांजपे, माजी सरपंच शांताराम इंगवले, शशांक वाघ आणि उज्वला लवाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचा प्रारंभ 'मानव्य' संस्थेच्या संस्थापिका स्वर्गीय विजयाताई लवाटे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व आदरांजली वाहून करण्यात आला.



याच वर्धापन दिनाचे औचित्य साधून 'मानव्य' संस्थेत उभारण्यात आलेल्या नवीन सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाचे उदघाटन 'सार्थ वेल्थ'चे संस्थापक अरविंद परांजपे यांच्या हस्ते व

याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रदीप लोखंडे यांनी ग्रामीण शिक्षण, वाचन संस्कृती आणि डिजिटल सक्षमीकरण या विषयांवर विशेष प्रकाश टाकला. देशभरात 'पोस्ट कार्ड आणि लायब्ररी मॅन' म्हणून काम करताना आलेले आपले समृद्ध अनुभव त्यांनी उपस्थितांसमोर मांडले. ते म्हणाले की, आपण सर्वांनी कायम लिहिते राहिले पाहिजे आणि लिहिते राहण्यासाठी मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक शाळेत समृद्ध वाचनालय सुरू करण्याची गरज आहे, कारण आपण वाचू तरच लिहू शकू. जीवनात सकारात्मकतेला आपलेसे केल्यास नकारात्मकता दूर पळते आणि यशाचा मार्ग सुकर होतो, असा मोलाचा सल्ला त्यांनी यावेळी दिला.

परांजपे म्हणाले की, या नवीन प्रकल्पामुळे संस्था ऊर्जेच्या बाबतीत अधिक स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण होईल. 'मानव्य' संस्थेमध्ये एक विलक्षण ऊर्जा असून ती मुलांच्या पंखात बळ देऊन त्यांना यशस्वी उड्डाणासाठी मोठे सहकार्य करत आहे, अशा सामाजिक कार्यात सहभागी होता आले याचा आपल्याला मोठा आनंद असल्याचे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना संस्थेचे अध्यक्ष शिरीष लवाटे यांनी 'मानव्य' संस्थेच्या प्रेरणादायी प्रवासाचा आढावा घेतला. संस्थेच्या उभारणीत विजयाताई लवाटे यांचे योगदान अतुलनीय असल्याचे सांगत, देवदासींच्या मुलांचे प्रश्न सरकारी दरबारी मांडून त्यांना समाजात सन्मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिल्याचे त्यांनी सांगितले. आज त्यांच्याच प्रेरणेने संस्थेतील मुले केवळ शैक्षणिक प्रगतीच करत नसून स्वतःच्या पायावर उभे राहून आपले संसारही यशस्वीपणे थाटत असल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला. या सोहळ्यात संस्थेच्या मुलांनी विविध सांस्कृतिक व गुणदर्शन कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली, ज्याला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमादरम्यान शामकांत सुतार यांनी माऊथ ऑर्गनचे सुंदर वादन करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले आणि भविष्यात संस्थेतील विद्यार्थ्यांना ते विनामूल्य माऊथ ऑर्गन शिकवणार असल्याचे घोषित केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन संस्थेचे विश्वस्त समीर ढवळे यांनी केले.

## जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत ६०० ज्येष्ठांना मोफत श्रवणयंत्र

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट ; कानाची तपासणी करून श्रवणयंत्र वाटप

पुणे (दै. संध्या)

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे सदाशिव पेठेतील फडके हॉल येथे झालेल्या शिबीरात महाराष्ट्रातील तब्बल ६०० ज्येष्ठांना श्रवणयंत्र मोल्ड चे वाटप करण्यात आले. जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत हा उपक्रम सातत्याने सुरु असून महाराष्ट्राच्या विविध शहरांतून तसेच ग्रामीण भागातून हे ज्येष्ठ नागरिक शिबीरासाठी पुण्यात आले होते.




पिनॅकल इंडस्ट्रीज, भगवान महावीर विकलांग सहाय्यता समिती आणि भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (ॲलिम्को) यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सुनील रासने म्हणाले, जय गणेश रुग्णसेवा अभिनायाच्या माध्यमातून २८ हजार हून अधिक गरजू रुग्णांना श्रवणयंत्र देण्यात आले आहेत.सातत्याने विविध शिबीरे आणि सुविधांचा रुग्णांना लाभ होत असून समाजाच्या तळागाळात पोहोचण्याचा ट्रस्टचा प्रयत्न आहे. नुकतेच मोफत महाआरोग्य शिबीरात देखील हजारो रुग्णांची तपासणी करून त्यांच्या पुढील उपचाराची व्यवस्था देखील करण्यात आली. कानाच्या विकारांप्रमाणेच विविध आजार, कृत्रिम अवयव यांसह सर्व प्रकारची वैद्यकीय मदत ट्रस्टच्या माध्यमातून सातत्याने केली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

## कात्रज घाटातील कचरा प्रश्नाची जबाबदारी नेमकी कोणाची?

पुणे (दै. संध्या)

कात्रज घाट परिसरात जैववैद्यकीय व इतर घनकचऱ्याच्या वाढत्या समस्येमुळे पर्यावरण आणि जैवविविधतेसमोर गंभीर संकट निर्माण झाले आहे. त्यानंतर स्वच्छ सर्वेक्षण अभियानांतर्गत दोन दिवसीय विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान सुमारे ५० ते ५५ मेट्रिक टन कचरा उचलण्यात आल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली. मात्र, कात्रज घाटातील कचऱ्याच्या समस्येची जबाबदारी नेमकी कोणाची, हा प्रश्न अद्यापही अनुत्तरितच आहे. महापालिका हद्दीपासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावरील वनविभागाच्या हद्दीतील जंगल परिसरात कचरा टाकला जातो.

या कचऱ्यामध्ये प्लास्टिक, वैद्यकीय कचरा तसेच इतर घनकचऱ्याचा समावेश आहे. शहरातील काही नागरिकांकडून हा कचरा जंगल परिसरात आणून टाकला जातो. या संदर्भात महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून कचरा टाकला जाणारा परिसर महापालिकेच्या हद्दीबाहेर असून तो वनविभागाच्या अखत्यारित येतो.

## प्रा. डॉ. विरेंद्र शेटे यांची आयईटीईच्या गव्हर्निंग कौन्सिलवर निवड

पुणे (दै. संध्या)


एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी (एडीटी) विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. विरेंद्र शेटे यांची इन्स्टिट्यूशन ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअर्स (आईटीई), नवी दिल्लीच्या २०२६–२०२९ या कार्यकाळासाठी गव्हर्निंग कौन्सिल सदस्य म्हणून निवड झाली आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्रातून या सर्वोच्च राष्ट्रीय संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलवर निवड झालेले ते केवळ दोन प्रतिनिधींपैकी एक आहेत.



शिक्षण, संशोधन, प्रशासकीय नेतृत्व आणि संस्थात्मक विकास क्षेत्रातील ३२ वर्षांहून अधिक अनुभव असलेल्या प्रा. डॉ. शेटे यांनी उच्च शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांनी १५० हून अधिक संशोधन निबंध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिके व परिषदांमध्ये प्रकाशित केले असून, त्यांच्या नावावर तीन पेटंट्स, पाच कॉपीराइट्स आणि तीन पुस्तके आहेत. यापूर्वी त्यांनी व्यवस्थापन परिषद सदस्य, शैक्षणिक परिषद सदस्य, परीक्षा मंडळ सदस्य, प्राचार्य/संचालक, उपप्राचार्य तसेच विभागप्रमुख अशा विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. अध्यापन व विद्यार्थी विकासातील योगदानाबद्दल त्यांना 'बेस्ट टीचर' पुरस्काराने देखील गौरविण्यात आले आहे.

## पुण्यातील पाणी कपातीवर पर्याय; 'डेड स्टॉक' वापरण्याची सामाजिक कार्यकर्ते जयंत इनामदार यांची मागणी

पुणे (दै. संध्या)



मागील 15 वर्षात शहर आणि उपनगरात, समाविष्ट गावांत ज्या सोसायट्या, मॉल आणि अन्य वास्तु निर्माण झाल्या आहेत, त्या सर्वांना फायर टँक बंधनकारक आहेत. यामुळे या सर्व पाणी साठ्याचा एकत्रित विचार केला तर तो साठा अंदाजे चारशे कोटी लीटर म्हणजे आपल्याकडे असलेल्या धरण साठ्या एवढा असल्याचे इनामदार यांनी सांगितले. शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर या प्रस्तावाची दखल घेऊन प्रशासनाने तज्ज्ञांशी चर्चा करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांतील पाणीसाठा केवळ २४.३० टक्क्यांवर आल्याने शहरात पाणी कपात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील विविध इमारतींमध्ये असलेल्या अग्निशमन टाक्यांमधील (फायर टँक) 'डेड स्टॉक' पाणी वापरण्याचा पर्याय विचारात घ्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते जयंत इनामदार यांनी पत्रकार परिषदेत केली.

या संदर्भात बोलताना इनामदार यांनी म्हटले आहे की, पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये अत्यल्प साठा उपलब्ध असल्याने नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर अनेक भागांत टँकरच्या पाण्याचे दर वाढू लागल्याचेही त्यांनी नमूद केले.

शहरातील बहुतांश मोठ्या इमारतींमध्ये जमिनीखाली अग्निशमनासाठी स्वतंत्र पाण्याच्या टाक्या असून, त्यातील पाणी आग लागल्याशिवाय वापरले जात नाही. अशा टाक्यांमधील साठ्याची एकत्रित गणना केल्यास तो जवळपास पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या एका धरणाच्या साठ्याइतका असू शकतो, असा दावा त्यांनी केला आहे.

गेल्या १० ते १५ वर्षांपासून अग्निसुरक्षा क्षेत्राचा अभ्यास करताना आणि विविध आगीच्या घटनास्थळी भेटी दिल्यानंतर, प्रत्यक्षात आग विझवण्यासाठी फायर टँक तसेच रस्त्यांवरील फायर हायड्रंटमधील पाणीच वापरले जात असल्याचे निरीक्षण समोर आल्याचे इनामदार यांनी सांगितले.

अग्निशमन अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, आग लागल्याच्या वेळी वेळ वाया जाऊ नये म्हणून फायर टँकची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे अशा टाक्यांमधील 'डेड स्टॉक' पाण्याचा नियंत्रित वापर करण्याबाबत प्रशासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा. पुढील एक महिना हा साठा वापरण्यास सुरुवात केल्यास पाणी कपातीची तीव्रता कमी होऊन टंचाईवर काही प्रमाणात मात करता येईल, असेही त्यांनी नमूद केले.

## अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी आणि एडीवायपीयू यांच्याकडून इंडस्ट्री-इंटिग्रेटेड बी.टेक प्रोग्राम लॉंच

**४ वर्षांचा रेसिडेन्शियल (निवासी) प्रोग्राममध्ये यूजीसी-मान्यताप्राप्त पदवीसह इंडस्ट्री-इंटिग्रेटेड एआय इंजिनिअरिंग शिक्षणाचे संयोजन**

पुणे (दै. संध्या)

अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी (यूजीएसओटी) आणि अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी (एडीवायपीयू) यांनी आज चार वर्षांचा निवासी बी.टेक इन कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) प्रोग्राम लॉंच करण्यासाठी धोरणात्मक सहयोगाची घोषणा केली. विद्यार्थ्यांना सुरुवातीपासून उद्योग-संबंधित एआय इंजिनिअरिंग कौशल्यांसह यूजीसी मान्यताप्राप्त पदवी प्रदान करण्यासाठी हा प्रोग्राम डिझाइन करण्यात आला आहे. पारंपारिक इंजिनिअरिंग शिक्षण आणि एआय-चालित कार्यक्षेत्रातील झपाट्याने बदलणाऱ्या गरजा यांमधील वाढती तफावत दूर करणे या प्रोग्रामचा मुख्य उद्देश आहे. या प्रोग्रामची पहिली बॅच ऑगस्ट-सप्टेंबर २०२६ मध्ये सुरू होणार आहे.



कोणत्याही मान्यताप्राप्त मंडळाकडून (सीबीएसई, आयसीएसई किंवा राज्य मंडळे) भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (पीसीएम) विषयांमध्ये किमान ५० टक्के गुणांसह इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या प्रवेशासाठी पात्र आहेत.

या सहयोगांतर्गत, अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी कॅम्पस पायाभूत सुविधा, निवासी शिक्षण वातावरण प्रदान करेल आणि यूजीसी-मान्यताप्राप्त बी.टेक पदवी बहाल करेल. यूजीएसओटी एडीवायपीयूसोबत सहयोगाने इंडस्ट्री-इंटिग्रेटेड (उद्योगाभिमुख) शिक्षण अनुभव देण्यास मदत करेल. यामध्ये जगातील आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या अभियंत्यांकडून लाईव्ह मार्गदर्शन, दर सहा महिन्यांनी अद्ययावत होणारा एआय-फर्स्ट अभ्यासक्रम, पहिल्या सेमिस्टरपासून प्रत्यक्ष कोडिंग व प्रॉडक्ट-बिल्डिंग स्प्रिंट्स, आणि उद्योग क्षेत्रातील संस्थापक, सीएक्सओ व आघाडीच्या प्रमुखांसोबत नियमित संवाद यांसारख्या वैशिष्ट्यांचा समावेश असेल.

**विद्यार्थी तीन भविष्य-केंद्रित विशेष शाखांमधून निवड करू शकतात:**

- फुल स्टॅक एआय आणि क्लाउड इनोव्हेशन– यामध्ये एंड-टू-एंड सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, एआय ॲप्लिकेशन्स आणि क्लाउड-नेटिव्ह तंत्रज्ञानाचा समावेश आहे.
- एआय आणि क्वांटम कम्प्युटिंग– यामध्ये आर्टिफिशिअल इंटेलिजन्स आणि उदयास येणाऱ्या क्वांटम कम्प्युटिंगच्या संकल्पना व उपयोजनांचे संयोजन आहे.
- एआय आणि जेनएआय इंजिनिअरिंग– हे प्रामुख्याने जनरेटिव्ह एआय, लार्ज लँग्वेज मॉडेल्स आणि नेक्स्ट-जनरेशन एआय प्रॉडक्ट डेव्हलपमेंटवर केंद्रित आहे.

टेक्निकल प्रशिक्षणाव्यतिरिक्त या प्रोग्राममध्ये सात सेमिस्टरचा स्टार्टअप ट्रॅक समाविष्ट करण्यात आला आहे, जो विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंगच्या कौशल्यांसोबत उद्योजकता, नेतृत्व आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यास सक्षम करतो.

या प्रोग्राममधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अपग्रॅडच्या करिअर सपोर्ट परिसंस्थेचा फायदा मिळेल, ज्यामध्ये ३००० पेक्षा जास्त हायरिंग पार्टनर्स आहेत. तसेच या प्लेसमेंट नेटवर्कने आर्थिक वर्ष २०२३ ते आर्थिक वर्ष २०२५ दरम्यान १,१०,००० हून अधिक प्लेसमेंट्स मिळवून दिल्या आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा रोजगार आणि करिअरच्या वाढीचा मार्ग अधिक प्रबळ झाला आहे.

या सहयोगाबाबत मत व्यक्त करत अजिंक्य डीवाय पाटील ग्रुपचे चेअरमन आणि अजिंक्य डी.वाय. पाटील युनिव्हर्सिटीचे चान्सलर डॉ. अजिंक्य डीवाय पाटील म्हणाले, "अजिंक्य डीवाय पाटील ग्रुपमध्ये आमचा नेहमी विश्वास राहिला आहे की, शिक्षण हे भविष्यानुसार बदलले पाहिजे. हा सहयोग शैक्षणिक विश्वासार्हता आणि उद्योग क्षेत्रातील उपयुक्तता यांना एकाच व्यासपीठावर आणतो, ज्यामुळे विद्यार्थी मान्यताप्राप्त पदवी मिळवण्यासह वेगाने बदलणाऱ्या जगात प्रगती करण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्येही आत्मसात करतील."

अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजीचे सीईओ विश्वा मोहन म्हणाले, "भारतात इंजिनिअरिंगच्या गुणवत्तेची कधीच कमतरता नव्हती, कमतरता होती ती उद्योग क्षेत्राला प्रत्यक्षात काय पाहिजे याच्याशी सुसंगत असणाऱ्या इंजिनिअरिंग शिक्षणाची. ही तफावत दूर करण्यासाठी अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटीसोबत हा सहयोग करण्यात आला आहे: एक खरी पदवी, एक खरा कॅम्पस आणि खरी कौशल्ये ज्यांच्या जोरावर कंपन्या पहिल्या दिवसापासून नोकरी देतात. आम्ही ज्या युनिव्हर्सिटींसोबत काम करत आहोत, तिथे हेच मॉडेल आणत आहोत."

भारतात दरवर्षी जवळपास १.५ दशलक्ष इंजिनिअरिंग पदवीधर तयार होतात, तरीही रोजगाराची मोठी तफावत या क्षेत्रासमोर आव्हान म्हणून उभी आहे.

इंजिनिअरिंग हा अजूनही देशातील सर्वात लोकप्रिय करिअर मार्गांपैकी एक असला तरी अनेक पदवीधरांकडे एआय, क्लाउड कम्प्युटिंग आणि प्रगत सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांसाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांचा अभाव दिसून येतो.

भविष्यासाठी सज्ज असलेल्या मनुष्यबळाची मागणी झपाट्याने वाढत असताना अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी आणि अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी यांच्यामधील या सहयोगाचा अशा इंडस्ट्री-इंटिग्रेटेड आणि एआय-फर्स्ट इंजिनिअरिंग शिक्षण मॉडेलच्या माध्यमातून ही तफावत दूर करण्याचा मनसुबा आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अविवाकडून बाणेर आणि शिवाजीनगरमध्ये नवीन शाखांसह पुण्यात विस्तार

पुणे (दैनिक संध्या) : अविवा लाईफ इन्शुरन्सने बाणेर आणि शिवाजीनगर येथे दोन नवीन शाखांचे उद्घाटन करून पुण्यात आपला विस्तार केला आहे. हा विस्तार शहरातील नागरिक आणि कुटुंबांना अधिक सुलभपणे वैयक्तिकृत संरक्षण व आर्थिक नियोजन उपाययोजना देण्याच्या अविवाच्या वचनबद्धतेला अधिक दृढ करतो. पुण्यातील दोन प्रमुख विकास मार्गिकांमध्ये असलेल्या या नवीन शाखा वैयक्तिकृत सल्ला आणि डिजिटल सेवा यांचा सुरेख संगम साधण्यासाठी तयार करण्यात आल्या आहेत. ग्राहक जलद सेवा साहाय्य आणि अधिक सल्लागार स्वरूपाच्या संवाद अनुभवाचा लाभ घेताना जीवन विमा योजनांच्या विस्तृत श्रेणीचा लाभ घेऊ शकतात. अविवा आपल्या विश्वसनीय सेवा आणि संरक्षण उपाययोजनांद्वारे ग्राहकांचा विश्वास सातत्याने वाढवत असतानाच्या काळात हा विस्तार झाला आहे. हा विश्वास कंपनीच्या तिच्या ९९.१८% च्या क्लेम सेटलमेंट रेशोमध्ये दिसून येतो. या प्रसंगी बोलताना अविवा इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. असित रथ म्हणाले: पुणे हे भारतातील सर्वात गतिमान आणि वेगाने वाढणाऱ्या शहरांपैकी एक आहे. या शहरात दीर्घकालीन आर्थिक सुरक्षा आणि संरक्षणाबद्दल जागरूकता वाढत आहे. आमच्या बाणेर आणि शिवाजी नगर शाखांचे उद्घाटन ग्राहकांसाठी संरक्षण, आरोग्य आणि विमा उपाय अधिक सुलभ करण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. डिजिटल वापर वाढत असला तरी व्यक्ती आणि कुटुंबांना माहितीपूर्ण आर्थिक निर्णय घेण्यास मदत करण्यासाठी विश्वासार्ह मानवी मार्गदर्शन महत्त्वाचे ठरते या गोष्टीवर आमचा विश्वास आहे. या नवीन शाखांमुळे आम्हाला ग्राहकांना अधिक उत्तम सेवा देता येईल आणि आरोग्य व आर्थिक सुस्थितीबद्दलचा आमचा दृष्टीकोन विस्तारता येईल. तसेच ग्राहकांसाठी प्रतिबंधात्मक उपाय आणि वैयक्तिक मार्गदर्शन उपलब्ध होईल. या विस्तारातून आपले वितरण जाळे मजबूत करण्यासाठी आणि प्रमुख विकास बाजारपेठांमध्ये आपली उपस्थिती अधिक दृढ करण्यासाठी अविवाच्या सातत्यपूर्ण गुंतवणुकीवर भर दिल्याचे दिसते. संरक्षणकेंद्रित आर्थिक उपाय ग्राहकांच्या अधिक जवळ आणून अविवा व्यक्ती आणि कुटुंबांना दीर्घकालीन आर्थिक लवचिकता निर्माण करण्यास आणि आत्मविश्वासाने त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यास मदत करण्यासाठी वचनबद्ध आहे.

### सॅमसंग कडून स्मार्ट एअर केअर आणि विंडफ्री क्लायमेट सोल्यूशन्स सादर

पुणे (दैनिक संध्या) : सॅमसंग ने आपल्या पुढील पिढीतील निवासी क्लायमेट सोल्यूशन्सच्या तैनातीची घोषणा केली. या सोल्यूशन्समध्ये WindFree™ कूलिंग, PM1.0 शुद्धीकरण, SmartThings कनेक्टिव्हिटी आणि AI-सक्षम VRF तंत्रज्ञानाचा समावेश असून, ते भारतातील प्रीमियम जीवनशैलीचा अनुभव नव्याने परिभाषित करतात. भारतातील शहरी भागांमध्ये वाढते तापमान आणि खालावणारी हवेची गुणवत्ता या वाढत्या समस्यांचा विचार करून सॅमसंग ने हे एकात्मिक इकोसिस्टम विकसित केले आहे. हे ग्राहकांच्या आरोग्य, घरातील हवेची गुणवत्ता, कनेक्टेड लिव्हिंग आणि ऊर्जा कार्यक्षमतेच्या गरजा पूर्ण करते. “सॅमसंग मध्ये आमचे नवोपक्रम तत्त्वज्ञान ग्राहकांच्या वास्तविक गरजा आणि दैनंदिन जीवनातील आव्हाने समजून घेण्यापासून सुरू होते. आजचे घरमालक केवळ पारंपरिक कूलिंगच्या पलीकडे जाऊन अधिक आरोग्यदायी हवा, कनेक्टेड अनुभव, बुद्धिमान ऊर्जा व्यवस्थापन आणि अधिक आरामाची अपेक्षा करतात. आमची WindFree™ क्लायमेट सोल्यूशन्स स्थानिक परिस्थितीसाठी विशेषतः अनुकूलित आहेत आणि ही सर्व वैशिष्ट्ये एका एकात्मिक इकोसिस्टममध्ये एकत्र आणतात, जे Samsung साठी वैशिष्ट्यपूर्ण आहे,” असे सॅमसंग इंडिया च्या SAC व्यवसाय विभागाचे प्रमुख विपिन अगरवाल यांनी सांगितले.

### कॅलिफोर्निया बदामांसह ‘सुपर सकाळ’ची सुरुवात; पोषणतज्ज्ञ व मान्यवरांचा सहभाग



पुणे (दैनिक संध्या) : दिवसाची सुरुवात ज्या पद्धतीने होते, त्यावर संपूर्ण दिवसाची गुणवत्ता अवलंबून असते. निरोगी सकाळच्या सवयींचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्नियाच्या वतीने पुण्यातील शेरेटन ग्रँड येथे ‘हर सुबह की सुपर शुरुआत : कॅलिफोर्निया बदाम के २४ न्यूट्रिएंट्स के साथ’ या विषयावर विशेष संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्राचे संचालन मॅक्स हेल्थकेअर, नवी दिल्ली येथील डायटेटिक्स विभागाच्या प्रादेशिक प्रमुख आणि पोषणतज्ज्ञ ऋतिका समद्दार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरजे उत्सवी यांनी केले. अभिनेत्री उर्मिला कानेटकर यांच्यासह जीवनशैली क्षेत्रातील प्रभावक साक्षी अग्रवाल, शिल्पा मेहर आणि हर्षा खत्री यांनी या चर्चेत सहभाग घेतला. सकाळच्या योग्य सवयी आणि पौष्टिक आहाराचा आरोग्यावर होणारा परिणाम याविषयी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. दैनंदिन आहारात कॅलिफोर्निया बदामांचा समावेश केल्यास आरोग्यदायी जीवनशैलीला चालना मिळू शकते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

### ‘इंडियाज गॉट नोव्हा' प्रोग्रॅम; इंडस्ट्रीतील ओपन रिव्ह्यू प्रोग्रामची यशस्वी वाटचाल सुरु




पुणे (दैनिक संध्या) : एआय+ स्मार्टफोन्स ने आज 'नोव्हा 2 निओ 5जी' आणि 'नोव्हा 2 प्रो 5जी' सादर केले आहे. या नवीन मॉडेल्समुळे कंपनीच्या 'नोव्हा सिरीज’ 'चा विस्तार झाला असून, भारतीय ग्राहकांना विश्वासार्ह, सुलभ आणि उत्कृष्ट कामगिरी देणारे स्मार्टफोन अनुभव पुरवण्याची त्यांची वचनबद्धता अधिक दृढ झाली आहे. डिझाइन, विश्वासार्हता आणि पारदर्शकता या समान तत्त्वांवर आधारित असूनही, वेगवेगळ्या वापरकर्त्यांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेले नोव्हा2 निओ 5जी आणि नोव्हा2 प्रो 5जी हे स्मार्टफोन्स हे नोव्हा अनुभव एका व्यापक ग्राहकवर्गापर्यंत पोहोचवतात, यामध्ये पहिल्यांदाच स्मार्टफोन वापरणारे ग्राहक आणि किंमतीचा विचार करणारे ग्राहक ते कंटेंट क्रिएटर्स, व्यावसायिक आणि उत्तम कामगिरीला प्राधान्य देणारे ग्राहक यांचा समावेश आहे. स्मार्टफोन लाँच करण्याच्या पारंपारिक पद्धतीं टाळत, 'एआय+ स्मार्टफोन्स'ने 'इंडियाज गॉट नोव्हा' या मनोरंजनावर आधारित कार्यक्रमाद्वारे आपली नवीन डिव्हाइसेस सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोदी कलाकार समय रैना आणि 'गॅझेट गुरू' राजीव मखनी यांनी केले. या लाँच सोहळ्यात प्रेक्षकांशी संवाद, प्रॉडक्टसचे प्रात्यक्षिक, थेट चर्चा आणि प्रत्यक्ष आव्हाने यांचा समावेश होता, ज्यामुळे ही डिव्हाइसेस अधिक वास्तववादी आणि ग्राहकाभिमुख पद्धतीने सादर करता आली.

# प्रकल्पांसाठी नाबार्डच्या माध्यमातून निधी उभाणार : मंत्री विखे पाटील

**मुंबई (दै. संध्या) :**

महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमातर्गत विविध प्रकल्पांसाठी नाबार्डच्या माध्यमातून निधी उपलब्ध करण्यात येईल. कार्यक्रमाच्या टप्पा दोन अंतर्गत होणाऱ्या या कामातून कृष्णा खोरे आणि गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळा अंतर्गत विविध सिंचन प्रकल्पातील कामांसाठी गती मिळेल असा विश्वास जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.



मंत्रालयात जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. याप्रसंगी आमदार सत्यजित पाटील , आमदार अमोल जगताप, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, सचिव संजय बेलसरे, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ हनुमंत धुमाळ, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळचे कार्यकारी संचालक जयंत गवळी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले, महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम राज्यातील पूर्ण झालेल्या १५५ जलसिंचन प्रकल्पांच्या कालवे व वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्याच्या कामासाठी ५ हजार ३६ कोटी रुपये तरतुदीसाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. नाबार्ड च्या माध्यमातून निधी उपलब्धतेच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करून कामास गती दिली जाईल.

अपूर्ण सिंचन प्रकल्प तसेच पूर्ण प्रकल्पांच्या वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करणेसाठी या टप्प्यातील ७५०० कोटीपैकी गोदावरी व कृष्णा खो-यात निधी उपलब्ध होणार असून सद्यस्थिती झालेला खर्चबाबतचा आढावा घेण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीत यापूर्वीच महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचन क्षमता यामधील तफावत दूर करण्याच्या दृष्टीने प्रथम टप्पात महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे अंतर्गत २१ प्रकल्पांना व गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत १० प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

यामध्ये महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे आणि गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर एकूण ३१ प्रकल्पांच्या बाबत चर्चा करण्यात आली. गोदावरी उजवा तट कालवा प्रकल्पाचा टप्पा २ मधून टप्पा १ मध्ये समावेश करण्यात आला आहे. तसेच प्रवरा डावा व उजवा कालवा दुरुस्ती व भोजापूर मध्यम प्रकल्प या प्रकल्पांचा प्रथम टप्यात नव्याने समावेश करण्यात आला आहे अशी माहिती यावेळी देण्यात आली.

## ‘प्रेमाला कंडिशन्स अप्लाय’ : प्रेमकथेचा भावनिक प्रवास २४ जूनपासून

**मुंबई (दै. संध्या) :**

कामाच्या ठिकाणी निर्माण होणारे प्रेम, त्यातील गुंतागुंत, महत्त्वाकांक्षा आणि आत्मसन्मान यांचा वेध घेणारी ‘प्रेमाला कंडिशन्स अप्लाय’ ही नवी मराठी ओरिजिनल वेबसीरिज २४ जून २०२६ पासून ZEE5 वर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सिद्धार्थ मेनन आणि जान्हवी उदय यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या मालिकेचे दिग्दर्शन गौरव पत्की यांनी केले असून निर्मिती क्रिएटिव्ह माइंड प्रॉडक्शन्सने केली आहे. ‘प्रेमाला कंडिशन्स अप्लाय’ ही कथा अनन्या आणि ऋषी या दोन महत्त्वाकांक्षी तरुण व्यावसायिकांच्या आयुष्याभोवती फिरते. कार्यालयीन वातावरणात झालेली त्यांची ओळख हळूहळू मैत्रीत आणि पुढे प्रेमात रूपांतरित होते. मात्र, व्यावसायिक मर्यादा, पदानुक्रम, करिअरची ध्येये आणि वैयक्तिक भावना यांच्या संघर्षामुळे त्यांच्या नात्यापुढे अनेक आव्हाने उभी राहतात.




कॉफी ब्रेकमधील संवाद, चोरट्या नजरा, लांबणाऱ्या गप्पा आणि भावनिक जवळीक यामुळे अनन्या आणि ऋषी यांच्यातील नाते अधिक दृढ होत जाते. परंतु कार्यालयीन नियम, अपेक्षा आणि जबाबदाऱ्या यांच्यामुळे हे नाते टिकवून ठेवणे कठीण बनते. प्रेम आणि करिअर यांच्यातील समतोल साधताना त्यांना अनेक कठोर निर्णयांचा सामना करावा लागतो. वेगवान कॉर्पोरेट जीवनशैलीच्या पार्श्वभूमीवर घडणारी ही कथा प्रेम, आत्मशोध, भावनिक असुरक्षितता आणि वैयक्तिक आनंदासाठी मोजावी लागणारी किंमत यांचा वास्तववादी वेध घेते.

# प्रवेशपत्राचा घोळ, सुरक्षेचा बोजवारा!

**पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधानभवनात गोंधळ**

> दरम्यान, दिवसअखेरही अनेकांचे व्हेरिफिकेशन आणि प्रवेश प्रक्रियेबाबत संभ्रम कायम असल्याने विधानभवन परिसरात गोंधळाचे वातावरण कायम होते.

**मुंबई (दै. संध्या) :**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर प्रवेशपत्र प्रक्रियेत अचानक करण्यात आलेल्या बदलामुळे सोमवारी विधानभवन परिसरात अभूतपूर्व गोंधळ निर्माण झाला. अधिवेशन सुरू होण्याच्या अवघ्या दोन दिवस आधी जुनी प्रवेश व्यवस्था बंद करून नवीन डिजिटल फेस-स्कॅनिंग प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने पत्रकार, शासकीय अधिकारी, पोलीस कर्मचारी आणि लोकप्रतिनिधींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.



विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधानपरिषद सभापती राम शिंदे यांच्या पुढाकाराने ही नवीन व्यवस्था लागू करण्यात आली. त्यानुसार सर्व संबंधितांना चेहरा पडताळणी (Face Verification) करूनच विधानभवनात प्रवेश देण्याचे निश्चित करण्यात आले होते. यासाठी शनिवार आणि रविवारी सकाळी १ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत विधानभवनात प्रत्यक्ष उपस्थित राहण्यास सांगण्यात आले होते. ज्यांना प्रत्यक्ष येणे शक्य नव्हते, त्यांना फोटो व आवश्यक माहिती ई-मेलद्वारे पाठविण्याचे निर्देश देण्यात आले होते.

संबंधितांचा डेटा पडताळून सर्वांना पुष्टीकरणाचा संदेश (Verification Message) पाठविण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. मात्र अधिवेशनाच्या पूर्वसंध्येपर्यंत बहुतांश व्यक्तींना कोणताही संदेश प्राप्त झाला नाही. परिणामी सोमवारी सकाळी विधानभवनात प्रवेशासाठी मोठी गर्दी झाली आणि प्रवेशद्वारांवर झुंबड उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या नव्या व्यवस्थेचा फटका आमदार भाई जगताप यांनाही बसला. त्यांनी पूर्वीच आपला फोटो सादर केला होता. मात्र प्रत्यक्ष प्रवेशावेळी फेस-रीडिंग प्रणालीने त्यांची ओळख पटवली नाही. चेहरा स्कॅन होत असूनही प्रवेशद्वार उघडत नसल्याने काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. एका विद्यमान आमदारालाच अशा अडचणींचा सामना करावा लागत असेल, तर सामान्य पत्रकार, कर्मचारी आणि अभ्यागतांची अवस्था काय झाली असेल, असा प्रश्न उपस्थितांकडून विचारला जात होता.

अशा प्रकारच्या अनेक तक्रारी पत्रकार, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडूनही करण्यात आल्या. विशेष म्हणजे, सुरक्षेच्या नावाखाली राबविण्यात आलेल्या या नव्या व्यवस्थेमुळेच प्रवेशद्वारांवर मोठी गर्दी निर्माण झाली. त्यामुळे सुरक्षेची हमी मिळण्याऐवजी सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची चर्चा उपस्थितांमध्ये रंगली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी डिजिटल प्रवेश व्यवस्थेचा फज्जा उडाल्याने संबंधित प्रशासन आणि विधिमंडळ सचिवालयावर टीकेची झोड उठत आहे.

## आपले साहित्य हे दुसऱ्यांच्या काळजाला भिडावे – विनोद अष्टुळ

**पुणे (दै. संध्या) :**

कवींनी विचारांचा वारसा जपायचा आहे. माणसांना जोडण्यासाठी एकमेकांचा हुंकार ऐकण्यासाठी आपण अशा साहित्य संमेलनामध्ये भेटत असतो. फक्त माझी कविता माझा फोटो एवढेच करून चालणार नाही. काळजाची कविता काळजापर्यंत पोहोचली पाहिजे. आपले साहित्य एखाद्या सम्राटासारखं राजासारखं असले पाहिजे. मी लिहिलेली कविता वाचताना स्वाभिमान वाटला पाहिजे. माझी कविता दुसऱ्याला कळतेय दुसऱ्याच्या काळजाला भिडतेय म्हणून मी साहित्यरत्न आहे साहित्य सम्राट आहे. आज साहित्याचा खजिना जिवंत ठेवण्यासाठी गंध माणुसकीचा जपण्याची आवश्यकता आहे. आपल्या साहित्यातील चांगल्या आणि वाईट गोष्टी एकमेकांना प्रेमाने सांगितल्या पाहिजेत. आपल्याला मिळालेला हा साहित्य खजिना वारसा हक्काने आपण जपूया. पुस्तक आलं आणि गेलं. असं झालं तर खजिना संपायला वेळ लागणार नाही.असे विचार अष्टुळ यांनी व्यक्त केले. माझं कविताचं गाव जकातवाडी राजधानी सातारा व गुंफण अकादमी मसूर यांच्या संयुक्त विद्यमाने पहिले राज्यस्तरीय कवी संमेलन एम्पायर क्लासेस कराड येथे आयोजित केले होते. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर संमेलन अध्यक्ष अशोक मोहिते, शिवचरित्र अभ्यासक अ‍ॅड.संभाजीराव मोहिते, गटशिक्षणाधिकारी बिपिन मोरे, संस्थापक अध्यक्ष प्रल्हाद पारटे, सुषमा आलेकर, डॉ.बसवेश्वर चेनगे, स्वाती बाजारे, सत्यवान मंडलिक, विश्वास नेरकर , पत्रकार सुनील गुरव, सदानंद माळी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन झाल्यानंतर शिवगर्जनेने साहित्य संमेलनाची सुरुवात झाली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ई बुक आणि गंध माणुसकीचा या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. व्यासपीठावरील मान्यवरांच्या मनोगतानंतर या राज्यस्तरीय साहित्य संमेलनासाठी आलेल्या राज्यातील अनेक कवी कवयित्री अमोल मांढरे, जयश्री काळे, अनिता मुंडे, विजया पाटील, हेमा पाटील, भाग्यश्री दीक्षित, आनंद जाधव, संजय शेवाळे, रोशन पिलेवान, संजय परीट, माधवी ढेकळे, स्वाती बाजार, संध्या पाटील, शमीम पटेल, सुनील गुरव, या सर्वांनी बाप, आई, बायको, मोबाईल, प्रेम, पाऊस, महागाई, राजकारण, समाजकारण अशा अनेक विविध विषयांवरच्या कविता सादर करून काव्य रसिकांची मने जिंकली. साहित्य संमेलनाचे सूत्रसंचालक माधवी ढेकळे यांनी तर बसवेश्वर चेनगे यांनी आभार व्यक्त केले.



## जामको इंटिरिअर्सचे पुण्यात अत्याधुनिक केंद्र

**पुणे (दै. संध्या) :**

विमान कॅबिन इंटिरिअर्स क्षेत्रातील जागतिक आघाडीची कंपनी जामको इंटिरिअर्सने पुण्यात आपल्या अत्याधुनिक ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’चे उद्घाटन केले आहे. सात दशकांहून अधिक काळाचा जपानी एअरोस्पेस अभियांत्रिकी वारसा असलेल्या कंपनीची ही गुंतवणूक भारताला जागतिक विमान अभियांत्रिकी नेटवर्कमधील महत्त्वाचा भाग बनवणार असून महाराष्ट्राच्या एअरोस्पेस आणि प्रगत अभियांत्रिकी परिसंस्थेला नवी चालना देणार आहे. जामको इंटिरिअर्सच्या जागतिक विस्तार धोरणातील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, पुण्यातील हे केंद्र विमान कॅबिनच्या संपूर्ण उत्पादन अभियांत्रिकीची




जबाबदारी सांभाळणार आहे. संकल्पना विकास, प्रणाली रचना, सविस्तर डिझाइन, प्रमाणन सहाय्य, ड्रॉइंग रिलीज आणि कॉन्फिगरेशन नियंत्रण यांसारखी महत्त्वाची कामे या केंद्रातून केली जाणार आहेत.

त्यामुळे महाराष्ट्रातील अभियंत्यांना जागतिक दर्जाच्या एअरोस्पेस प्रकल्पांमध्ये थेट योगदान देण्याची संधी मिळणार आहे. जामको इंटिरिअर्स ही वाइडबॉडी विमानांसाठी लागणाऱ्या कॅबिन प्रणालींची जगातील प्रमुख पुरवठादार कंपनी आहे.

# राज्याच्या इतिहासातील सर्वात मोठ्या पुरवणी मागण्या

## ९७ हजार कोटींपेक्षा अधिक निधीची अधिवेशनात मांडणी : शेतकरी कर्जमाफीसाठी २०,५५२ कोटी, मेट्रो प्रकल्पांसाठी ३,३७२ कोटी

**ऊर्जा, रोजगार व सामाजिक योजनांनाही मोठी तरतूद**

**मुंबई (दै. संध्या) :**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारी सुरुवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारने तब्बल ९७ हजार ७० लाख ६४ हजार ३९ कोटींच्या विक्रमी पुरवणी मागण्या सादर केल्या. राज्याच्या इतिहासातील ही सर्वाधिक रकमेची पुरवणी मागणी मानली जात आहे. गत पावसाळी अधिवेशन २०२५ मध्ये ५७,५०९.७१ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या होत्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात ४०,५५२ कोटींची महसुली तूट आणि १ लाख ५० हजार ४९१ कोटींची वित्तीय तूट दर्शविण्यात आली होती. त्यानंतर आता सादर झालेल्या या उच्चांकी पुरवणी मागण्यांमधून शेती, पायाभूत सुविधा, ऊर्जा, रोजगार आणि सामाजिक कल्याण योजनांना मोठा निधी देण्यात आला आहे.



अवकाळी पाऊस व इतर नैसर्गिक संकटांमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने कर्जमाफीसाठी २०,५५२ कोटींची तरतूद केली आहे. या योजनेला ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर’ योजनेचे नाव देण्यात आले असून त्यासाठी एकूण ३६,५८५ कोटी खर्च करण्यात येणार आहेत.

केंद्र सरकारच्या भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेअंतर्गत विविध विकासकामांसाठी व्याजमुक्त कर्ज म्हणून ९,९३४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मुंबई महानगर प्रदेशातील विविध मेट्रो प्रकल्पांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) ३,३७२ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

ठाणे-बोरिवली बोगदा प्रकल्प तसेच मुंबईतील पूर्व मुक्तमार्गाजवळील भुयारी मार्ग प्रकल्पासाठी ४५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना कर्जवाटपासाठी ८०० कोटींचा निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळासाठी १,००० कोटींचे भागभांडवल उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ऊर्जा क्षेत्रासाठीही मोठी तरतूद करण्यात आली असून महावितरणच्या कर्जावरील व्याजफेडीसाठी ३,००० कोटी, शासकीय कार्यालयांच्या वीजबिलांसाठी ४,००० कोटी आणि महावितरणच्या कर्जफेडीसाठी स्वतंत्रपणे ५,००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

किमान आधारभूत किंमत (एमएसपी) योजनेतील तूट भरून काढण्यासाठी १,७५० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील रोजगार आणि उपजीविकेला चालना देण्यासाठी ‘विकसित भारत – रोजगार व आजीविका अभियान (ग्रामीण)’ योजनेसाठी ७,३६७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

महिला व बालविकास विभागांतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मानधन आणि वेतनासाठी १,७३४ कोटींची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. तसेच संजय गांधी निराधार, दिव्यांग व इतर लाभार्थी योजनांसाठी ८७४ कोटी ३७ लाख ९८ हजार रुपयांचा अतिरिक्त निधी मंजूर करण्यात आला आहे.

राज्य सरकारच्या या विक्रमी पुरवणी मागण्यांमधून शेतकरी, पायाभूत सुविधा, ऊर्जा, ग्रामीण रोजगार आणि सामाजिक कल्याण योजनांवर विशेष भर देण्यात आल्याचे स्पष्ट होत आहे. आगामी काळात या मागण्यांवर विधिमंडळात सविस्तर चर्चा होऊन त्यास मंजुरी दिली जाणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### लोणावळ्यातील कैवल्यधाममध्ये आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा

■ खासदार श्रीरंग बारणे यांची उपस्थिती

मावळ (दैनिक संध्या) : लोणावळ्यातील प्रसिद्ध कैवल्यधाम योग संस्थेत आंतरराष्ट्रीय योगदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांची प्रमुख उपस्थिती होती. साधक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. लोणावळ्याचे नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे, उपनगराध्यक्ष देविदास कडू, कैवल्यधाम योग संस्थेचे मानद सचिव सुबोध तिवारी यावेळी उपस्थित होते. योग शिक्षिका देवश्री गांगुली, सागर ठाकूर यांनी योगाचे धडे दिले. सूर्य नमस्कार, कंधारासन, मर्कटासन, द्वीपाद उत्तानपादासन, भुजंगासन, तिरयक भुजंगासन, शशांकासन, बद्ध कोनासन, ताडासन, वीरासन इत्यादी आसने तसेच कपालभाती, भास्त्रिका, अनुलोम विलोम, शितली शितकारी प्राणायाम करण्यात आले. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, भारताने योग ही जगाला दिलेली मोठी देणगी आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात योग पोहोचवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. त्यांच्या माध्यमातून जागतिक योग दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली. माणसाने सुदृढ राहण्यासाठी योगा करण्याची गरज आहे. जगाला योगाची गरज आहे. त्यासाठी एक दिवस नव्हे तर दररोज नियमितपणे योग करणे आवश्यक आहे.



### पिंपरी विधानसभा मतदार संघातर्फे राजकीय पक्ष प्रतिनिधींची बैठक संपन्न

पिंपरी (दैनिक संध्या) : भारत निवडणूक आयोगामार्फत महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येणारे विशेष सखोल पुनरीक्षण मोहीमेबाबत सर्वोतपरी माहिती देणेसाठी राष्ट्रीय व राज्यस्तरीय राजकीय पक्ष प्रतिनिधिची बैठक २०६ पिंपरी (अ. जा) विधानसभा मतदारसंघातर्फे घेण्यात आली. या बैठकीला विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीमध्ये सर्वांना विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेतील सविस्तर कामकाज,वेळापत्रक आदी माहिती मतदार नोंदणी अधिकारी अर्चना यादव यांनी दिली. तसेच ३० जून २०२६ पासून एन्युमरेशन फॉर्मचे वाटप मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेमार्फत सुरू होणार असून प्रारूप मतदार यादी ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच त्यानंतर हरकतीवर सुनावणी घेऊन मुख्य यादी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध होणार आहे. या मोहिमेसाठी राजकीय पक्षांनी यादी भाग निहाय बीएलए - २ नियुक्त करणे आवश्यक असून या कालावधीत मतदार यादी अद्ययावत व अचूक करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याने, त्यामध्ये सर्व राजकीय पक्षांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे अर्चना यादव यांनी सांगितले. याप्रसंगी उपस्थित पक्ष पदाधिकारी,प्रतिनिधींनी प्रशासनास सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

### सामाजिक बांधिलकी जोपासत श्रीटिकेल या खासगी कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी केले रक्तदान

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय. सी.एम. रुग्णालयाच्या सहकार्याने पिंपरी औद्योगिक वसाहतीतील श्रीटिकेल कंपनीच्या २७५ कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत रक्तदान केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम. रुग्णालय रक्त केंद्रासाठी व पुणे शहरातील पूना हॉस्पिटल या रक्तकेंद्राच्या वतीने श्रीटिकेल कंपनीचे डॉ राजेश पांढरीपांडे यांच्यासह कंपनीतील सर्व विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या रक्तदान शिबिरामध्ये सहभाग नोंदवून रुग्णालयामध्ये दाखल होणाऱ्या गोरगरीब गरजू रुग्णांसाठी एक सामाजिक बांधिलकी जपत अप्रत्यक्षरीत्या सेवा कार्यात सहभाग नोंदवला. या शिबिरात एकूण २७५ कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. यावेळी वाय.सी. एम. रुग्णालयाच्या रक्त केंद्राचे प्रमुख डॉ. तुषार पाटील म्हणाले की, श्रीटिकेल कंपनीप्रमाणे इतर कंपन्यांनी पुढे येऊन आपल्या कंपनीत रक्तदान शिबिराचे आयोजन करावे. जेणेकरून आपल्या परिसरातील दाखल होणाऱ्या कामगारांना व गोरगरीब गरजू रुग्णांना खऱ्या अर्थाने मदत होईल. वाय.सी.एम. रुग्णालयाचे डॉ. मीना सोनवणे यांनी कंपनीमध्ये भेट देऊन तेथील अधिकारी कर्मचारी यांना वायसीएम रुग्णालयामध्ये रक्त व रक्त घटकांची किती आवश्यकता आहे, तसेच रक्तदात्यांना रक्तदान केल्याने आपल्या स्वतःला व समाजाला कशा रीतीने त्याचा फायदा होतो, यासंदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले. हे शिबिर यशस्वी करण्याकरिता वाय.सी.एम. रुग्णालय रक्तकेंद्राचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. नीता घाडगे, डॉ. गणेश लांडे, डॉ. स्नेहा सूर्यवंशी, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता किशन गायकवाड, अश्विन कंजे, नर्सिंग ऑफिसर गीता चव्हाण, विपुल गायकवाड, रक्तकेंद्र तंत्रज्ञ वृषाली अमृतकर व त्यांचे सर्व कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### कोकण खेड युवाशक्ती सामाजिक संस्थेच्या प्रदेशाध्यक्षपदी संतोष कदम यांची निवड



पिंपरी (दैनिक संध्या) : कोकण खेड युवाशक्ती सामाजिक संस्था, पुणे महाराष्ट्र राज्य यांच्या 2026-28 या कालावधीसाठी नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यामध्ये युवा नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या संतोष कदम यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवडमधील संभाजीनगर येथील दत्त मंदिर हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला कॅप्टन श्रीपत कदम, अशोक कदम, उद्योजक मनोहर यादव, कोकण विकास महासंघाचे युवक अध्यक्ष गजानन मोरे, उद्योजक ज्ञानेश्वर कदम, पंधरा गावांचे माजी अध्यक्ष व सचिव नाना उतेकर, संदीप साळुंखे, रुपेश मोरे, अभिजीत कदम तसेच कोकण खेड युवाशक्तीचे सर्व सभासद उपस्थित होते. निवडीनंतर बोलताना संतोष कदम यांनी कोकणातील युवकांना एकत्रित करून सामाजिक, शैक्षणिक व विकासात्मक उपक्रमांना अधिक गती देण्याचा निर्धार व्यक्त केला. युवकांच्या सहभागातून संस्थेची ताकद वाढवून समाजहिताची कामे अधिक प्रभावीपणे राबविण्यावर भर दिला जाईल, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संदीप कदम आणि सूरज उतेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन अंकुर चव्हाण यांनी केले.

# अशुद्ध पाणीपुरवठा करणाऱ्या टँकर चालकांवर कारवाई करा

## खासदार श्रीरंग बारणे यांची सूचना, पाणीपुरवठ्याचा घेतला आढावा

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरात टँकरने मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा केला जातो. टँकर चालक हे पाणी कोठून घेतात, ते पिण्यायोग्य आहे का याची चौकशी करावी. पैसे जास्त घेऊन सोसायटीधारकांना आर्थिक बुर्दंड टाकला जातो. सोसायटीधारकांची लूट थांबवावी. त्यासाठी टँकर चालकांवर निर्बंध आणावेत. त्यांची नोंद ठेवावी. स्वच्छ पाणी न दिल्यास टँकर चालकांवर कारवाई करण्याची सूचना शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका प्रशासनाला केली आहे. तसेच इतर विकास कामांबाबत काटकसर करावी. पाणीपुरवठ्याच्या कामांवर भर देऊन ही कामे तत्काळ पूर्ण करावीत. याबाबत आयुक्त आणि महापौरांशीही चर्चा करणार असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.



शहरात चार दिवसांपासून पाणी कपात करण्यात आली. विस्कळीत पाणीपुरवठ्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाल्याने खासदार बारणे यांनी सोमवारी महापालिका अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली. अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, नागसेविक सुलभा उबाळे, ऐश्वर्या तरस, नगरसेवक निलेश तरस, राजेंद्र तरस, पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता महेश बरिदे, विजयसिंह भोसले, सुनिल अहिरे, कनिष्ठ अभियंता अनिश ओक उपस्थित होते. दरम्यान, खासदार श्रीरंग बारणे यांनी गेल्या आठ वर्षात पवना धरणातील एक लाख क्युबिक मीटर गाळ काढल्याने दीड महिना पुरेल एवढा पाणीसाठा उपलब्ध झाला. एक टीएसी पाणीसाठा वाढला आहे. त्यामुळे उन्हाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई जाणवली नाही. शासनाची कोणतीही मदत न घेता खासदार बारणे यांनी लोकसहभागातून हा गाळ काढला. अन्यथा गंभीर पाणी टंचाईला सामोरे जावे लागले असते.

खासदार बारणे म्हणाले, कमी दाबाने, अस्वच्छ पाणीपुरवठ्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. समान पाणीपुरवठा होत नाही. काही ठिकाणी जास्त, काही ठिकाणी कमी तर काही ठिकाणी पाणी येतच नाही. पाणी समान वाटपासाठी स्काडा प्रणाली बसविली. मीटर बदलले. जलवाहिनी बदललली. पाण्याच्या टाक्या सर्वाधिक उभारल्या. ३० टक्के पाणी गळती होत आहे. अनधिकृतपणे नळजोड घेतले जातात. ते रोखण्यात प्रशासनाला अपयश आले आहे. नियोजनशून्य कारभारामुळे पाणी समस्या कायम आहे. प्रशासन उशिरा जागे झाले आहे. पाणी काटकसरीचे नियोजन अगोदरच करणे अपेक्षित होते. पाणी बचतीचे वर्षभर नियोजन करावे. स्वच्छ पाणीपुरवठ्यासाठी आत्तापासूनच तयारी करावी. महापालिका अशुद्ध पाणी उपसा करित असलेला नदी पात्राचा परिसर अतिशय अस्वच्छ आहे. तेथील नदीपात्र स्वच्छ करावे. मुळशी धरणातून अतिरिक्त सात टीएमसी पाणी आणण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा.

शहरातील ४९४ सोसायट्यांपैकी ३६९ सोसायट्यांमधील एसटीपी चालू आहेत. १२५ सोसायट्यांमधील एसटीपी बंद आहेत. सोसायट्यांमधील एसटीपी चालू आहेत की नाही यावर निगराणी ठेवावी. एसटीपीतील पाणी वाहने धुने, उद्यानासाठी वापरण्याकरिता नागरिकांना प्रोत्साहित करावे. जुन्या सोसायट्यांना एसटीपी उभारणे शक्य नाही. तिथे महापालिकेने लहान एसीटीपी उभारण्याचा प्रयत्न करावा, अशी सूचनाही खासदार बारणे यांनी केली.

### गृहप्रकल्पासाठी बंद जलवाहिनीचे पाईप काढले

पवना बंदिस्त जलवाहिनीची कोट्यवधी रुपये खर्च करुन टाकलेली पाईपलाईन किवळेतील कैवल्य सोसायटी आणि सेंटीयोगा या दोन सोसायट्यांनी बांधकाम परवानगी विभागाच्या संगनमतानी काढली आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे. त्यामुळे महापालिकेचे कोट्यावधीचे रुपयांचे नुकसान झाले आहे. यामध्ये कोण आहे, त्याचा शोध घ्यावा आणि कठोर कारवाई करावी अशी सूचना खासदार बारणे यांनी केली.

## ४१२ कोटी रुपयांच्या मालमत्ता कर संकलनाचा टप्पा पार

पिंपरी (दै. संध्या)

■ मालमत्ता करावरील सवलतींचा लाभ घेण्यासाठी शेवटचे ८ दिवस

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये मालमत्ता कर संकलनात ४१२ कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. दि. १ एप्रिल २०२६ ते २२ जून २०२६ या कालावधीत ३ लाख ६५ हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी जवळपास ४१२ कोटी ९७ लाख रुपयांचा मालमत्ता कर भरला असून, कर संकलनात सातत्याने वाढ होत आहे. महापालिकेच्या १८ क्षेत्रीय कार्यालयांपैकी वाकड विभागाने सर्वाधिक ५६.३९ कोटी मालमत्ता कर संकलित केला आहे. तसेच, त्याखालोखाल थेरगाव विभागाने ३७.३६ कोटी, कस्पटे वस्ती विभागाने ३२.९१ कोटी, किवळे विभागाने ३०.३८ कोटी मालमत्ता कर संकलित केला आहे. याचबरोबर मालमत्ता कराच्या सामान्य करावर विविध प्रकारच्या सवलतींचा लाभ घेण्यासाठी आता केवळ ८ दिवस शिल्लक राहिले आहेत.

सवलतींची अंतिम मुदत ३० जून २०२६ असून नागरिकांनी शेवटच्या दिवसाची वाट न पाहता त्वरित मालमत्ता कर भरून उपलब्ध सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने केले आहे. महापालिकेकडून आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांना सामान्य करावर १० टक्के सवलत देण्यात येत आहे.

## सामाजिक कार्यकर्ते मारुती जाधव यांचा पाठपुरावा

### प्रभाग क्रमांक ११ मध्ये पावसाळ्यापूर्वी ड्रेनेज व स्ट्रॉम वॉटर लाईन कामांना गती

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ११ मधील नागरिकांना दरवर्षी पावसाळ्यात जलसाचणे, ड्रेनेज तुंबणे आणि अस्वच्छतेच्या समस्यांना सामोरे जावे लागत होते. या समस्यांची गंभीर दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सामाजिक कार्यकर्ते मारुती जाधव यांनी प्रश्न मार्गी लावण्यासाठी फ क्षेत्रीय कार्यालयाकडे सातत्याने पाठपुरावा करून निवेदनाद्वारे मागणी केली होती.मारुती जाधव यांच्या पाठपुराव्याला यश मिळत असून प्रशासनाने प्रभागातील स्ट्रॉम वॉटर लाईन, नाले आणि ड्रेनेज लाईनची साफसफाई व दुरुस्तीची कामे हाती घेतली आहेत.



भीमशक्ती नगर, कृष्णानगर, महात्मा फुले नगर, घरकुल, कोयना नगर, शरद नगर तसेच परिसरातील विविध भागांमध्ये पावसाळ्यापूर्वी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

या कामांमुळे पावसाचे पाणी साचणे, रस्त्यांवर सांडपाणी येणे तसेच नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित समस्या मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे. विशेषतः घरकुल व भीमशक्ती नगर परिसरातील नागरिकांना याचा मोठा दिलासा मिळणार आहे.

याबाबत मारुती जाधव यांनी सांगितले की, "नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी सातत्याने पाठपुरावा करणे हे आमचे कर्तव्य आहे. प्रशासनाने आमच्या मागणीची दखल घेऊन कामांना सुरुवात केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो. उर्वरित कामेही लवकरात लवकर पूर्ण करून नागरिकांना कायमस्वरूपी दिलासा द्यावा."प्रभाग क्रमांक ११ मधील नागरिकांच्या वतीने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासन, फ क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी आणि संबंधित विभागांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत. नागरिकांच्या हितासाठी अशीच सकारात्मक आणि तत्पर कार्यवाही पुढेही सुरू राहील, अशी अपेक्षा जाधव यांनी व्यक्त केली आहे.

## आंतरराष्ट्रीय सिलंबम स्पर्धेसाठी २१ खेळाडूंची भारतीय संघात निवड

### महापौर रवि लांडगे यांनी केले अभिनंदन; आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा

पिंपरी (दै. संध्या)

जालना येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय सिलंबम अजिंक्यपद स्पर्धेमध्ये भारताच्या राष्ट्रीय संघाची निवड करण्यात आली असून १ व २ ऑगस्ट २०२६ रोजी मलेशिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सिलंबम अजिंक्यपद स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघामध्ये पिंपरी-चिंचवड शहरातील तब्बल २१ खेळाडूंची निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशामुळे शहराच्या क्रीडा क्षेत्रातील नावलौकिकात आणखी भर पडली आहे. भारतीय संघामध्ये निवड झालेल्या खेळाडूंमध्ये आदर्श केकंड, आदित्य टेळेकर, आनंद गायकवाड, अनन्या हेलावे, अथर्व कऱ्हाडे, देवराज भुटेकर, हर्षल धाने, काशिनाथ हेवळे, प्रिया सैनी, राज वायकोळे, ऋतुजा



कुलकर्णी, साक्षी सैनी, श्रेया दांडे, सिद्धार्थ चौधरी, सूरज बांगर, सूरज टाळेकर, वैदेही नवले, वेदांत तापकीर, विश्वजीत पवार, यश बलगुडे आणि संजय बनसोडे यांचा समावेश आहे. सिलंबम ही भारतातील प्राचीन पारंपरिक युद्धकला असून तिच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडू सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करत आहेत. पिंपरी-चिंचवडमधील या खेळाडूंनी कठोर परिश्रम, शिस्त, जिद्द आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर यश मिळवत भारतीय संघात स्थान मिळविले आहे. या निवडीमुळे केवळ खेळाडूंचाच नव्हे तर पिंपरी-चिंचवड शहराचाही गौरव झाला असून पारंपरिक भारतीय क्रीडा आणि युद्धकलेच्या क्षेत्रातील शहराचे योगदान अधोरेखित झाले आहे. आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत हे खेळाडू देशाचे प्रतिनिधित्व करत उत्कृष्ट कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

“मलेशिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सिलंबम स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झालेल्या पिंपरी-चिंचवडमधील सर्व खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन. त्यांची निवड ही त्यांच्या कठोर परिश्रमांची, शिस्तीची आणि समर्पणाची पावती आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करताना ते निश्चितच देशाचा आणि शहराचा गौरव वाढवतील, असा मला विश्वास आहे. त्यांच्या उज्वल कामगिरीसाठी आणि यशस्वी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.”

## अतिक्रमण निर्मूलन मोहिमेला गती; अडीच महिन्यांत ८२० ठिकाणी कारवाई

पिंपरी (दै. संध्या)

■ १०४ हजार चौरस मीटरहून अधिक अनधिकृत बांधकामांवर कारवाई

■ नाले, रस्ते व सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महापालिकेची मोहीम सुरूच

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागामार्फत शहरातील सार्वजनिक जागा, रस्ते, पदपथ, नाले तसेच अनधिकृत बांधकामांवर सातत्याने कारवाई करण्यात येत असून १ एप्रिल २०२६ ते २२ जून २०२६ या कालावधीत शहरातील विविध भागांमध्ये एकूण ८२० ठिकाणी अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या मोहिमेत एकूण ४५१ अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली असून सुमारे १ लाख ४ हजार २७०.९६ चौरस मीटर क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आले आहे. तसेच शहरातील विविध नाल्यांवरील २३ अतिक्रमणे हटविण्यात आली असून अंदाजे ८३९ चौरस मीटर क्षेत्र मोकळे करण्यात आले आहे. याशिवाय सार्वजनिक रस्ते, पदपथ आणि नागरिकांच्या वर्दळीच्या ठिकाणी अडथळा निर्माण करणाऱ्या फेरीवाले, पथारीवाले आणि इतर अतिक्रमणांवरही कारवाई करण्यात आली. या कालावधीत अशा एकूण ३४६ अतिक्रमणांचे निर्मूलन करण्यात आले. क्षेत्रीय कार्यालयनिहाय पाहता सर्वाधिक २२९ कारवाया क क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत करण्यात आल्या.

# पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापनाला चालना

## शून्य कचरा संकलन उपक्रमाला नागरिकांचा मिळतोय उत्स्फूर्त प्रतिसाद!

पिंपरी (दै. संध्या)

कचरा व्यवस्थापनात नागरिकांच्या सहभागातून सकारात्मक बदल घडत असल्याचे चित्र पिंपरी चिंचवड शहरात दिसून येत आहे. महापालिकेच्या शून्य कचरा संकलन (झिरो वेस्ट स्लम) उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून गेल्या महिनाभरात ११.४७ टन कचऱ्याचे स्रोतस्तरावर विलगीकरण करण्यात आले आहे. या उपक्रमात १९ हजार ८०५ घरांनी सहभाग नोंदविला आहे.

महापालिकेच्या आकडेवारीनुसार, महिनाभरात कालावधीत ९.९७ टन ओला कचरा




आणि १.५० टन सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करण्यात आला. याशिवाय, ६४३ किलो सॅनिटरी कचऱ्याचे सुरक्षित पद्धतीने व्यवस्थापन करण्यात आले. कचऱ्याच्या वर्गीकरणामुळे पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती प्रक्रियेला गती मिळत असून, पर्यावरणीय परिणाम कमी करण्यास मदत होत आहे.

कचरा डेपोवरील वाढता ताण कमी करण्यासाठी आणि पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी महापालिकेकडून शून्य कचरा संकल्पना राबविण्यात येत आहे. घराघरांत ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य कचरा वेगळा करण्याची सवय वाढत असल्याने कचऱ्याच्या वैज्ञानिक व्यवस्थापनाला बळ मिळत आहे.

याबाबत महापौर रवि लांडगे म्हणाले, शून्य कचरा संकलन उपक्रमाला मिळणारा नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ही पिंपरी चिंचवडकरांच्या पर्यावरणाप्रती असलेल्या बांधिलकीची साक्ष आहे. स्रोतस्तरावर कचऱ्याचे विलगीकरण केल्यास कचऱ्याचे प्रमाण कमी होण्याबरोबरच पुनर्वापर आणि पुनर्निर्मितीलाही चालना मिळते. स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत शहर घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने कचरा विलगीकरणाची सवय कायम ठेवावी. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आवाहन करताना सांगितले की, शहर स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत ठेवण्यासाठी नागरिकांनी ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य कचरा अशा चार प्रकारांत कचरा विलगीकरणाची सवय कायम ठेवावी. नागरिकांचा वाढता सहभाग ही या उपक्रमाची जमेची बाजू ठरत असून, ‘माझा कचरा, माझी जबाबदारी’ ही संकल्पना अधिक बळकट होत आहे. अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम म्हणाले, कचरा व्यवस्थापनामध्ये नागरिकांचा सहभाग हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. झिरो वेस्ट स्लम उपक्रमामुळे कचऱ्याचे स्रोतस्तरावर वर्गीकरण वाढत असून, कचरा संकलन आणि प्रक्रियेमध्ये कार्यक्षमता निर्माण होत आहे. नागरिकांनी या उपक्रमात अधिकाधिक सहभागी होऊन शहराच्या स्वच्छता चळवळीला बळ द्यावे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आंतरराष्ट्रीय योग दिन आर्वीकेंद्र शाळेत उत्साहात साजरा

बस्ती सावरगाव (दैनिक संध्या) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आर्वीकेंद्र येथे दि. २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून देत विविध योगासने व प्राणायामाचा सराव घेण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी वृक्षासन, ताडासन, भुजंगासन, त्रिकोणासन, वज्रासन तसेच सूर्यनमस्कार यांसारख्या विविध योगासनांचे प्रात्यक्षिक सादर केले. योगाभ्यासामुळे शरीर निरोगी, मन प्रसन्न व एकाग्र राहण्यास मदत होते, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः विद्यार्थ्यांनी वृक्षासनाचा सराव करून संतुलन, आत्मविश्वास व एकाग्रता वाढविण्याचा संदेश दिला. सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला. यावेळी "एक पृथ्वी, एक आरोग्य यासाठी योग" हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण झाली असून निरोगी जीवनशैलीचा संकल्प करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापिका श्रीमती भारती आल्हाट मॅडम व उपशिक्षक श्री साईनाथ कनिंगध्वज सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सौ.तेजस्विनीताई आशिष गाढवे व उपाध्यक्ष भाग्यश्रीताई स्वप्नील गाढवे केंद्रप्रमुख सौ.शोभा डोंगरे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



### गोजुबावी हायस्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा

गोजुबावी (दैनिक संध्या) : रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, गोजुबावी (ता.बारामती) येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता पाचवी ते दहावी अखेरच्या सर्व विद्यार्थ्यांनी २१ जून २०२६ रोजी विद्यालयांमध्ये सकाळी ७:३० वाजता उपस्थित राहून आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विविध योगासने प्राणायाम प्रात्यक्षिके केली. विद्यालयातील श्री.अजित थोरात व सौ.मनीषा विरकर यांनी अतिशय उत्तम प्रकारे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करून दाखविले.विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वैशाली बेंडसुरे मॅडम यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.अशाप्रकारे विद्यालयांमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन अतिशय उत्साहाच्या वातावरणात पार पडला.कार्यक्रमाच्या वेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.वैशाली बेंडसुरे मॅडम,सौ.अर्चना अनारसे,सौ.लीना सोनटक्के, श्री.किशोर भोसले, सौ.मनीषा विरकर,सौ.प्रीतम पानसरे, श्री.अजिनाथ थोरात,श्री.विजय जाधव,श्री.बजरंग गटकळ आदी उपस्थित होते.




### ओन्ली वुमन्स जिम व श्री स्वामी समर्थ सेवा संस्थेतर्फे योग दिन उत्साहात साजरा

शिरूर (दैनिक संध्या) : आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त शिरूर येथील ओन्ली वुमन्स जिम आणि श्री स्वामी समर्थ सेवा संस्था, प्रीतम प्रकाश नगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला सामूहिक योग साधना कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. योग, प्राणायाम आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला महिला व नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. यावेळी वुमन्स फाउंडेशनच्या अध्यक्षा प्रिया बिरादार यांनी उपस्थितांचे कौतुक करत अशा आरोग्यदायी आणि समाजिताच्या उपक्रमाची पुढेही सातत्याने गरज असल्याचे मत व्यक्त केले. या कार्यक्रमामध्ये विविध वयोगटातील महिला व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत योगाचे महत्त्व अनुभवले. कार्यक्रमादरम्यान योगी आचार्य गोपेश जी ब्रह्मपुरीकर यांनी उपस्थितांना योग साधना, प्राणायाम तसेच दैनंदिन जीवनात आरोग्यदायी सवयी अंगीकारण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी योग हा केवळ शारीरिक व्यायाम नसून शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधणारी जीवनपद्धती असल्याचे सांगण्यात आले. सहभागी नागरिकांनी विविध योगासनांचा सराव करत निरोगी, आनंदी आणि सकारात्मक जीवन जगण्याचा संकल्प केला.

# निसर्गोपचार आश्रमाचा ‘योग संगम’ कार्यक्रम उत्साहात संपन्न

**योगाचा संदेश घराघरांत**



**उरुळी कांचन (दै. संध्या)**

परमपूज्य महात्मा गांधी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या उरुळी कांचन (ता. हवेली) येथील निसर्गोपचार आश्रमाच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त महिनाभर राबविण्यात आलेल्या “योगा फॉर हेल्दी एजिंग” या विशेष अभियानाचा समारोप २१ जून रोजी मोठ्या उत्साहात “योग संगम” या भव्य कार्यक्रमाने झाला. या अभियानाच्या माध्यमातून तब्बल १८ हजारांहून अधिक नागरिकांपर्यंत योग आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश पोहोचविण्यात आला. महिनाभर चाललेल्या या अभियानात ताय ची, हस्त योग, चेअर योग, डेस्कटॉप योग, साउंड मेडिटेशन, व्याख्यानमाला आदींसह एकूण १६ विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील सर्व वयोगटांपर्यंत योगाचे महत्त्व पोहोचविण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले. याशिवाय दौंड, हिंगणगाव, वाडेबोल्हाई तसेच विविध शाळा, उद्योगसंस्था आणि श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना येथे विशेष योग शिबिरांचे आयोजन करण्यात आले. यात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. योगाच्या माध्यमातून शारीरिक व मानसिक आरोग्य जपण्याचा संदेश मोठ्या प्रमाणात जनमानसापर्यंत पोहोचला. कार्यक्रमात निसर्गोपचार आश्रमाचे संचालक व विश्वस्त सचिव डॉ. अभिषेक देविकार यांनी “योग ३६५” ही संकल्पना मांडत निरोगी वृद्धत्वासाठी योगाचे वैज्ञानिक महत्त्व स्पष्ट केले. योग हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित नसून तो वर्षभर अंगीकारला गेला पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. तसेच गेले अनेक वर्षापासून हा उपक्रम निसर्गोपचार आश्रम च्या माध्यमातून राबविला जातो. असे डॉ. अभिषेक देवीकर देविकार यांनी सांगितले. या संपूर्ण अभियानाचे समन्वयन डॉ. समृद्धी व्यास यांनी केले. तसेच योगाचार्य डॉ. भगवती मुखेडकर, जलींदर वाडेकर, तुषार जगदाळे आणि राहुल मेमाणे यांनी विविध उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे योगदान दिले. दरम्यान, निसर्गोपचार आश्रम व Dietos यांच्या संयुक्त विद्यमाने “नो गॅस डे” या अभिनव उपक्रमाचाही शुभारंभ करण्यात आला. नैसर्गिक व न शिजवलेल्या आहाराचा प्रसार, एलपीजी बचत आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणारा हा उपक्रम नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळवत आहे.

या व्यापक अभियानातून योग हा केवळ आंतरराष्ट्रीय योग दिनापुरता मर्यादित नसून तो दैनंदिन जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनविण्याचा संदेश देण्यात आला. योगाच्या माध्यमातून निरोगी, सुदृढ आणि आनंदी समाज घडविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

## रिक्षाचालकाच्या प्रामाणिकपणामुळे ६० हजारांचा मोबाईल मालकिणीला परत

**उरुळी कांचन (दै. संध्या)**




उरुळी कांचन (ता. हवेली) पोलीस स्टेशन हद्दीतील एका रिक्षाचालकाने दाखविलेल्या प्रामाणिकपणामुळे हरवलेला सुमारे ६० हजार रुपये किमतीचा मोबाईल त्याच्या मालकिणीला परत मिळाला. या घटनेमुळे संबंधित रिक्षाचालकाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कोरेगाव मूळ येथील गोल्डन सोसायटीमध्ये राहणाऱ्या विना प्रशांत परदेशी यांचा सॅमसंग कंपनीचा सुमारे ६० हजार रुपये किमतीचा मोबाईल हरवला होता. मोबाईल हरवल्यानंतर त्यांनी उरुळी कांचन पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. पोलीसांनी तत्काळ मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संबंधित मोबाईल रिक्षामध्ये पडल्याचे निष्पन्न झाले.

## गुरुवर्य रा. प. सबनीस विद्यामंदिरात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**नारायणगाव (दै. संध्या)**



आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त गुरुवर्य रा. प. सबनीस विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, नारायणगाव तसेच रोटरी क्लब नारायणगाव, रोटरी क्लब हायवे, प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्वविद्यालय, नारायणगाव व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. योग दिनाच्या निमित्ताने ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिल तात्या मेहेर यांनी निरोगी जीवनाविषयी मार्गदर्शन करताना योगाचे महत्त्व विशद केले. तसेच डॉ. उत्तमराव घोरपडे यांनी आपण स्वतः दररोज व्यायाम करतो व व्यायामाचे आरोग्यदायी फायदे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयच्या संगीता बहेनजी यांनी शरीरासोबत मन सुदृढ असणेही तितकेच गरजेचे असल्याचे सांगितले.

तर डॉ. प्रशांत काचळे यांनी भारतीय संस्कृतीतील योगाचे महत्त्व आपल्या मनोगतातून अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा विभाग प्रमुख राहुल नवले यांनी केले, तर आभार कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य संजय वलटे यांनी मानले.

## अतुल झेंडे यांच्या कार्याची कल्याण डोंबिवली महापालिकेकडून दखल

**कोरेगावमुळ (दै. संध्या)**



कल्याण डोंबिवली शहरातील अंमली पदार्थांविरोधातील धडक कारवाईमुळे चर्चेत कल्याण डोंबिवलीचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे आणि त्यांच्या सहकारी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याची दखल आता थेट कल्याण डोंबिवली महानगरपालिका महासभेत घेण्यात आली आहे. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महासभेत अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला असून, सर्वपक्षीय नगरसेवकांनी समर्थन देत हा ठराव एकमुखाने मंजूर केला.पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या नेतृत्वाखाली कल्याण डोंबिवली पोलीस प्रशासनाने शहरातील अंमली पदार्थांच्या अवैध नेटवर्कविरोधात मागील काही महिन्यांपासून विशेष मोहीम उघडली आहे. या मोहिमेत सहभागी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विविध भागांत धाडसत्र राबवत अनेक आरोपींना मकोका कायद्याअंतर्गत अटक केली असून, कोट्यावधी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे शहरातील व्यसनमुक्ती मोहिमेला बळ मिळाले असून, तरुण पिढीला व्यसनाच्या गर्तेत जाण्यापासून रोखण्यासाठी पोलीस प्रशासन गंभीरपणे काम करत असल्याचे दिसून येत आहे. शहरातील अनेक भागांत अंमली पदार्थांची विक्री आणि सेवन वाढत असल्याबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात होती. विशेषतः तरुणांमध्ये वाढणारे व्यसन हे पालकांसाठी चिंतेचे कारण बनले होते. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने केवळ कारवाईच नाही, तर माहिती संकलन, गुप्त तपास आणि स्थानिक पातळीवर समन्वय साधत अंमली पदार्थांविरोधात मोठी मोहीम उभारली. या मोहिमेत पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्यासह त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत अनेक संशयितांचे जाळे उघडकीस आणले. परिणामी शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तींवरही मोठ्या प्रमाणात आळा बसल्याचे बोलले जात आहे. अतुल झेंडे हे पुरंदर तालुक्यातील दिवे गावचे सुपुत्र आहेत.कल्याण डोंबिवली महापालिकेच्या वतीने केलेल्या गौरवाबद्दल पुरंदर वाशियाकडून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत असून सोशल मीडियाच्या सर्व स्तरातून कौतुक होत आहे. महासभेत या विषयावर चर्चा होत असताना अनेक नगरसेवकांनी पोलीस प्रशासनाच्या सामूहिक कामगिरीचे कौतुक केले. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच युवकांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी पोलीस विभाग करत असलेले प्रयत्न अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सदस्यांनी नमूद केले. अंमली पदार्थांविरोधातील कठोर कारवाईमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, पोलीस प्रशासनाविषयीचा विश्वास अधिक दृढ झाल्याचेही सभागृहात सांगण्यात आले. पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या नेतृत्वाखाली कल्याण डोंबिवली पोलीस प्रशासनाने विविध गुन्हेगारी कारवायांविरोधात सातत्याने आक्रमक पवित्रा घेतला आहे. अंमली पदार्थांविरोधातील मोहिमेबरोबरच गुन्हेगारी टोळ्यांवर कारवाई, संशयितांवर लक्ष आणि कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी घेतलेले निर्णय यामुळे संपूर्ण पोलीस यंत्रणा अधिक सक्रिय झाल्याचे चित्र दिसून येत आहे. या यशामध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून ते स्थानिक पोलीस कर्मचारी आणि तपास पथकातील सहकाऱ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जात आहे. महापालिकेच्या महासभेत मंजूर झालेला अभिनंदनाचा ठराव हा केवळ एका अधिकाऱ्याच्या कार्याचा गौरव नसून, पोलीस उपायुक्त अतुल झेंडे आणि त्यांच्या सहकारी पोलीस अधिकाऱ्यांनी शहराला व्यसनमुक्त व सुरक्षित ठेवण्यासाठी केलेल्या सामूहिक प्रयत्नांची अधिकृत दखल मानली जात आहे. या निर्णयामुळे संपूर्ण पोलीस दलाचे मनोबल उंचावले असून, भविष्यातही अंमली पदार्थांविरोधातील मोहिम अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नागरिकांकडूनही या कारवाईचे स्वागत होत असून, शहरात अशाच धडक कारवाया सातत्याने सुरू राहाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## श्रीमती रत्नभागा कबीरबूवा यांचा ‘माई माऊली’ पुरस्काराने गौरव



**आळंदी (दै. संध्या)**

आळंदी येथील माऊली भक्त स्व.पार्वतीबाई देवराम काळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात आळंदी देवस्थानचे विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबूवा यांच्या मातोश्री श्रीमती रत्नभागा केशवराव लोंढे कबीरबूवा यांना ‘माई माऊली’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ज्ञानेश्वर महाराज चरित्र समितीचे अध्यक्ष प्रकाश काळे यांच्या माध्यमातून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप म्हणून मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ तसेच साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी आळंदी देवस्थानचे विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबूवा, माजी नगराध्यक्ष सुरेश वडगावकर, माजी चेअरमन ज्ञानेश्वर पाटील, सचिव अजित वडगावकर, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, तुकाराम गवारी, श्रीधर घुंडरे, दीपक काळे, सचिन काळे, बंडूनाना काळे, संकेत वाघमारे, पुष्पाताई कुऱ्हाडे, संगिता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमानिमित्त विणा मंडप येथे हभप सुभाष महाराज गेठे यांचे सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले. तसेच काळे परिवाराच्या वतीने आषाढी पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या काही दिंड्यांना शिधा वाटप करण्यात आले. यावेळी मनोगत व्यक्त करताना आळंदी देवस्थानचे विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबूवा म्हणाले, की “माझ्या मातोश्रींना ‘माई माऊली’ पुरस्काराने गौरविण्यात आले, हा आमच्या परिवारासाठी अत्यंत भावनिक आणि आनंदाचा क्षण आहे. त्यांच्या आयुष्यातील साधेपणा, भक्तीभाव आणि समाजाभिमुख संस्कार हेच आमच्यासाठी प्रेरणास्थान राहिले आहेत. हा सन्मान त्यांच्या कार्याला आणि सेवाभावाला मिळालेली पावती असून भविष्यातही समाजसेवा व वारकरी परंपरेचे कार्य अधिक जोमाने सुरू ठेवण्याची प्रेरणा यातून मिळाली आहे.” कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रकाश काळे यांनी केले तर मानपत्रांचे वाचन अजित वडगावकर यांनी केले. सुत्रसंचालन श्रीधर घुंडरे यांनी केले व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## चिन्मय मिशनतर्फे तुलसी रामायणावर आधारित सुंदरकांड ज्ञानयज्ञास प्रारंभ

अहिल्यानगर (दै. संध्या) : श्रीराम हे केवळ एका युगाचे नायक नसून, संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श जीवनमूल्यांचे प्रतीक आहेत. रामायण ही केवळ कथा नसून, ती भारतीय संस्कृतीचे जीवन, तत्त्वज्ञान आहे. रामकथा कधीही जुनी होत नाही, कारण प्रत्येक पिढीला ती नवे संस्कार, नवी प्रेरणा आणि जीवन जगण्याची दिशा देत असते. चार वेद, उपनिषदे आणि सनातन संस्कृतीचा अमूल्य वारसा आपल्या समाजाला आजही टिकवून ठेवत आहे, असे प्रतिपादन व्यासपीठ चालक स्वामी अद्वैतानंद सरस्वती यांनी केले. चिन्मय मिशनतर्फे आयोजित तुलसी रामायणावर आधारित सुंदरकांड ज्ञानयज्ञाच्या प्रारंभी ते बोलत होते. यावेळी स्वामी प्रत्ययानंद सरस्वती, महापौर ज्योती गाडे, मिशनचे अध्यक्ष ॲड. डी. डी. घोरपडे, उपाध्यक्ष विद्या हारदे, कोषाध्यक्ष उत्तमराव साळुंखे, सचिव देवराम मोरे तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर व रामभक्त उपस्थित होते.

# आजचा तरुण आणि कौशल्यविकसित भारत
## लोकसंख्येच्या लाभांशाचे सामर्थ्यात रूपांतर

**भारत हा जगातील सर्वाधिक युवा लोकसंख्या असलेला देश आहे,ही केवळ सांख्यिकीय बाब नाही;ती इतिहासाने दिलेली एक विलक्षण संधी आहे.अनेक राष्ट्रांनी नैसर्गिक साधनसंपत्तीच्या बळावर विकास साधला,काहींनी तंत्रज्ञानाच्या जोरावर जागतिक नेतृत्व मिळवले. भारताकडे मात्र यापेक्षा वेगळी आणि अधिक मौल्यवान संपत्ती आहे-ती म्हणजे भारताची युवा शक्ती.ही शक्ती योग्य दिशेने घडवली,तर भारताला विकसित राष्ट्र होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही;परंतु तिचे योग्य संवर्धन झाले नाही,तर हाच लोकसंख्येचा लाभांश गमावण्याचा धोका आहे.**



**इंजि. विकास संजय निर्मळ**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
कृषि उद्योग मूल शिक्षण संस्था,
काऱ्हाटी, ता. बारामती, जि. पुणे

आजचा प्रश्न तरुणांची संख्या किती आहे?हा नाही;तर त्या तरुणांकडे भविष्यातील जगाशी स्पर्धा करण्यासाठी आवश्यक कौशल्ये आहेत का?हा आहे.कारण एकविसाव्या शतकातील अर्थव्यवस्थेत पदवीपेक्षा क्षमता, प्रमाणपत्रापेक्षा कौशल्य आणि अनुभवापेक्षा सातत्याने शिकण्याची वृत्ती अधिक महत्त्वाची ठरत आहे.

गेल्या तीन दशकांत भारताने उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय विस्तार केला.विद्यापीठांची संख्या वाढली,महाविद्यालयांचे जाळे विस्तारले आणि लाखो युवक-युवती उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आले. ही निश्चितच सकारात्मक बाब आहे. मात्र या विस्तारासोबत गुणवत्तेचा प्रश्नही अधिक ठळकपणे समोर आला.उद्योगक्षेत्र वारंवार सांगते की, उमेदवारांकडे शैक्षणिक पात्रता आहे; परंतु प्रत्यक्ष कामासाठी आवश्यक कौशल्यांची कमतरता जाणवते. शिक्षण आणि रोजगार यांतील ही दरी केवळ रोजगाराचा प्रश्न नाही;ती विकासाच्या प्रक्रियेलाच प्रभावित करणारी बाब आहे.

याचे मूळ आपल्या शिक्षणपद्धतीत आहे.ज्ञानार्जनाला प्राधान्य देताना कौशल्य,नवोपक्रम,समस्या सोडविण्याची क्षमता,संवादकौशल्य, टीमवर्क आणि कार्यसंस्कृती यांसारख्या गुणांना अपेक्षित महत्त्व मिळाले नाही.शिक्षणाचे मूल्य गुणपत्रिकेपुरते मर्यादित राहिले तर कौशल्याचे मूल्य उद्योगांच्या दारात जाऊन उमगते ही परिस्थिती आहे. ही दरी जितक्या लवकर भरून काढली जाईल,तितकी भारताची विकासयात्रा अधिक वेगवान होईल.

दरम्यान,जगाचा रोजगार नकाशा झपाट्याने बदलत आहे.कृत्रिम बुद्धिमत्ता,हरित ऊर्जा,रोबोटिक्स, सेमीकंडक्टर,ड्रोन,डिजिटल सेवा आणि प्रगत उत्पादन क्षेत्रे उद्याची अर्थव्यवस्था घडवत आहेत.अशा काळात शिक्षण एकदाच पूर्ण होणारी प्रक्रिया राहिलेली नाही;आयुष्यभर नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची तयारी हेच भविष्यातील यशाचे सूत्र ठरणार आहे.त्यामुळे कौशल्य विकास हा पर्याय नसून,बदलत्या काळाशी सुसंगत राहण्याची जीवनशैली आहे.

यासाठी शासनाने विविध स्तरांवर महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू केले आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०,स्किल इंडिया मिशन,प्रधानमंत्री कौशल विकास योजना,अप्रेंटिसशिप आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षण यांसारख्या प्रयत्नांनी सकारात्मक दिशा दिली आहे. मात्र कोणतीही योजना तेव्हाच यशस्वी ठरते,जेव्हा ती शिक्षणसंस्था,उद्योग आणि समाज यांच्या सक्रिय सहभागातून प्रत्यक्षात उतरते.कौशल्य विकास ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ती राष्ट्रीय भागीदारीची प्रक्रिया आहे.

शिक्षण संस्थांसमोरही नवी जबाबदारी उभी आहे. वर्गखोल्यांतील शिक्षण हे उद्योग,संशोधन आणि प्रत्यक्ष अनुभवाशी जोडले गेले पाहिजे. विद्यार्थ्यांनी प्रकल्पाधारित शिक्षण, इंटर्नशिप,संशोधन,स्टार्टअप्स आणि उद्योजकतेकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. रोजगार शोधणारे नव्हे,तर रोजगार निर्माण करणारे युवक घडविणे हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे.

यासोबतच समाजाच्या मानसिकतेतही परिवर्तन आवश्यक आहे.कौशल्याधारित शिक्षण म्हणजे केवळ हाताचे काम,असा गैरसमज अजूनही अनेक ठिकाणी आढळतो. प्रत्यक्षात कौशल्य म्हणजे बुद्धिमत्ता, सर्जनशीलता आणि कार्यक्षमतेचा संगम आहे.ज्या समाजाने श्रमाला प्रतिष्ठा दिली,त्यानेच आर्थिक समृद्धीचा मार्ग खुला केला. भारतालाही ही मूल्यदृष्टी अधिक दृढ करावी लागेल.

आजचा भारतीय तरुण हा केवळ नोकरीसाठी इच्छुक नाही;तर तो संशोधक आहे,उद्योजक आहे,तंत्रज्ञ आहे,नवोन्मेषक आहे आणि उद्याच्या भारताचा शिल्पकार आहे.त्याच्या ऊर्जेला योग्य दिशा मिळाली,तर भारताचा लोकसंख्येचा लाभांश हा जगासाठी आदर्श ठरू शकतो.


'विकसित भारत २०४७' ही केवळ शासनाची घोषणा नाही;ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.या प्रवासाचा पाया संसदेत किंवा मंत्रालयांत नाही,तर शाळा,महाविद्यालये,आयटीआय, पॉलिटेक्निक,इंजिनीरिंग प्रयोगशाळा,उद्योग आणि कौशल्य विकास केंद्रांमध्ये रचला जात आहे. तेथे घडणारा प्रत्येक कुशल युवक म्हणजे विकसित भारताच्या इमारतीतील एक भक्कम खांब आहे.

शेवटी, राष्ट्रनिर्मितीचा खरा पाया नैसर्गिक संसाधनांमध्ये नसतो;तो मानवी संसाधनांमध्ये असतो. पदवी, कौशल्य,मूल्ये आणि नवोन्मेष यांचा समतोल साधणारी युवा पिढी घडविणे हीच आज भारताची सर्वात मोठी राष्ट्रीय गरज आहे. लोकसंख्येचा लाभांश हा नियतीने दिलेला वारसा असतो;परंतु त्याचे सामर्थ्यात रूपांतर करणे ही राष्ट्राच्या दूरदृष्टीची खरी कसोटी असते.






दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे



### विधानपरिषद तालिका सभापतींची नियुक्ती जाहीर

मुंबई (दैनिक संध्या) : विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला पहिल्या दिवशी विधान परिषदेच्या कामकाजासाठी तालिका सभापतींची नियुक्ती सभापती प्रा. राम शिंदे यांनी जाहीर केली. तालिका सभापती म्हणून सदस्य प्रमोद जठार, कृपाल तुमाने, संजय खोडके, अभिजीत वंजारी, सुनील शिंदे यांची नियुक्ती करण्यात आल्याचे सभापती प्रा. शिंदे यांनी जाहीर केले.

### दिवंगत सदस्यांना विधानपरिषदेत श्रद्धांजली

मुंबई (दैनिक संध्या) : विधानपरिषदेत पद्मविभूषण आशा भोसले, पद्मभूषण सुमन कल्याणपूर यांच्यासह दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी यासंदर्भातील शोकप्रस्ताव मांडला. पद्मविभूषण आशा भोसले, पद्मभूषण सुमन कल्याणपूर यांच्यासह माजी वि.प.स. दिवंगत प्रा. भाऊराव तुळशीरामजी देशमुख, सुरेशकुमार कन्हैय्यालाल जेथलिया यांच्या निधनाबद्दल विधानपरिषदेत आदरांजली अर्पण करण्यात आली.

### भक्ती, संस्कृती आणि परंपरेचा संगम

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' निमित्त सोमवार, 6 जुलै 2026 रोजी सकाळी 10 वाजता त्र्यंबकेश्वर मंदिर, नाशिक येथे विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, अध्यात्म आणि सनातन परंपरेचे महत्त्व जनमानसापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' हा भारतीय सांस्कृतिक अस्मिता, अखंड श्रद्धा आणि अध्यात्मिक परंपरेचा गौरव करणारा उपक्रम आहे. या पर्वाच्या निमित्ताने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमातून भारतीय संस्कृतीतील विविध भावविश्व, भक्तीपरंपरा आणि आध्यात्मिक मूल्यांचे कलात्मक सादरीकरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात चित्रपट अभिनेत्री संस्कृती बालगुडे व कलाकार समूह यांचे विशेष अध्यात्मिक सादरीकरण होणार असून, त्यांच्या अभिव्यक्तीतून भक्ती, संस्कृती आणि भारतीय परंपरेचे विविध पैलू रसिकांना अनुभवता येणार आहेत. त्र्यंबकेश्वर मंदिराच्या पवित्र परिसरात होणारा हा सांस्कृतिक कार्यक्रम अध्यात्म आणि कलेचा सुंदर संगम ठरणार आहे. या माध्यमातून उपस्थितांना सांस्कृतिक वारशाचा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

### मुख्यमंत्र्यांकडून नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय

मुंबई (दैनिक संध्या) : राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनास आज प्रारंभ झाला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा सभागृहास परिचय करून दिला. नवनिर्वाचित सदस्यांमध्ये डॉ. नीलम गोऱ्हे, ओमप्रकाश ऊर्फ बच्चू बाबाराव कडू, अंबादास एकनाथराव दानवे, डॉ. प्रज्ञा राजीव सातव, प्रमोद शांताराम जठार, झीशान झिआउद्दीन सिद्दीकी, माधवी संजय नाईक, सुनिल विनायक कर्जतकर, विवेक बिपिनदादा कोल्हे आणि संजय नथ्थुजी भेंडे यांचा समावेश आहे. मुख्यमंत्र्यांनी या सर्व सदस्यांचे सभागृहात स्वागत करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### पावसाळी अधिवेशनाच्या कामकाजास प्रारंभ

मुंबई (दैनिक संध्या) : विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनास आजपासून प्रारंभ झाला. विधानपरिषदेत वंदे मातरम् व 'जय जय महाराष्ट्र माझा' या राज्यगीताने कामकाजास सुरुवात झाली. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील इतर मंत्रीगण तसेच विधान परिषद सदस्य उपस्थित होते.

## चित्रपट निर्मितीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जबाबदारीने व्हावा : राज्यपालांचे आवाहन

**मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट समारोह राज्यपालांच्या उपस्थितीत संपन्न**

■ मुंबई (दै. संध्या)

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) सर्जनशील क्षेत्रासाठी अमर्याद संधी उपलब्ध करून देत असली तरी तिचा वापर अत्यंत जबाबदारीने आणि विवेकाने केला गेला पाहिजे, असे आवाहन राज्यपालांनी यावेळी बोलताना केले. कृत्रिम बुद्धिमत्ता ही परिवर्तन घडवून आणणारी शक्ती आहे. मात्र तिचा वापर करताना चित्रपट निर्माते आणि सर्जकांच्या बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत आज सात दिवसांपासून सुरु असलेला मिफ - २०२६ हा लघुकथा, माहितीपट आणि ॲनिमेशन चित्रपटांचा १९ वा द्विवार्षिक महोत्सवाची सांगता झाली. यावेळी ते बोलत होते.

राज्यपाल म्हणाले की, गेल्या काही वर्षांत मिफ हा माहितीपट, लघुकथा आणि ॲनिमेशन चित्रपटांचा प्रतिष्ठित महोत्सव झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या वर्षी मुंबईत वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट (WAVES) परिषदेचे उद्घाटन केले होते. या परिषदेमुळे सर्जनशील



अर्थव्यवस्था आणि डिजिटल कथाकथन क्षेत्रात भारताला जागतिक केंद्र बनविण्याच्या देशाच्या आकांक्षेला बळ मिळाले.

यंदाच्या मुंबई चित्रपट महोत्सवामध्ये जगातील ४६ देशांतून १,४५९ चित्रपटांनी सहभाग घेतल्याबद्दल राज्यपालांनी समाधान व्यक्त केले. या महोत्सवात ४२ हून अधिक भारतीय भाषा तसेच ३० आंतरराष्ट्रीय भाषांमधील चित्रपट प्रदर्शित करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

माहितीपट समाजातील वास्तवाचे चित्रण करतात, इतिहास जतन करतात, रूढ समजुतींना आव्हान देतात आणि सामाजिक परिवर्तनाला चालना देतात. माहितीपट समाजातील विविध घटकांच्या समस्यांना व्यासपीठ देतात आणि भविष्यातील समाज घडविणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधतात, असे त्यांनी सांगितले.

भारताकडे जगातील सर्वात मोठी युवा लोकसंख्या असल्याचे नमूद करून राज्यपालांनी ग्रामीण आणि आदिवासी भागातील तरुण चित्रपट निर्मात्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनातील अनुभव, परंपरा आणि संघर्ष यांवर आधारित कथा मांडण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. महिला चित्रपट निर्मात्यांचा अधिकाधिक सहभाग वाढावा, जेणेकरून त्यांच्या दृष्टिकोनांमुळे भारतीय कथाकथन अधिक समृद्ध होईल, असे त्यांनी सांगितले. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे चित्रपटनिर्मिती अधिक लोकाभिमुख झाली असून नव्या सर्जनशील संधी उपलब्ध झाल्या असल्याचेही त्यांनी नमूद केले. मिफ आणि राज्यातील विद्यापीठांमधील माध्यम व मनोरंजन विभाग यांच्यात अधिक सहकार्य व्हावे अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली. अशा सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक चित्रपट प्रवाहांचा परिचय होईल आणि भविष्यातील सर्जनशील प्रतिभेला चालना मिळेल, असे त्यांनी सांगितले.

## महाराष्ट्र एमएसएमई परिषद व पुरस्कारासाठी नोंदणी करण्याचे महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळाचे आवाहन

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्या वतीने जागतिक एमएसएमई दिनानिमित्त 27 जून 2026 रोजी वाशी येथील सिडको प्रदर्शन केंद्रात 'महाराष्ट्र MSME परिषद व MSME पुरस्कार 2026' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी 9 ते सायंकाळी 5.30 या वेळेत होणाऱ्या या परिषदेसाठी राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) क्षेत्रातील उद्योजकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. 'संकल्पातून सिद्धीकडे - From Commitment to Achievement' ही यंदाच्या परिषदेची संकल्पना असून राज्यभरातील 2,500 हून अधिक MSME उद्योजक, वित्तीय संस्था, उद्योगतज्ज्ञ, गुंतवणूकदार तसेच आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. निर्यातवृद्धी, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल परिवर्तन, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, शाश्वत औद्योगिक विकास, वित्तपुरवठा आणि महिला उद्योजकता यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर विविध चर्चासत्रांचे आयोजनही करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या परिषदेदरम्यान महाराष्ट्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या उद्योगांचा गौरव करण्यासाठी महाराष्ट्र MSME पुरस्कार 2026 प्रदान करण्यात येणार आहेत. यामध्ये कारागीर व हस्तकला, नेक्स्टजेन MSME, डिजिटल व AI उत्कृष्टता, सेवा, उत्पादन, हरित उद्योग, महिला उद्योजक, निर्यात आणि चॅम्पियन MSME अशा नऊ श्रेणींचा समावेश आहे. चॅम्पियन MSME पुरस्कार वगळता इतर सर्व श्रेणींमध्ये 'एक्सलन्स' आणि 'अचिव्हर्स' या दोन उपश्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या पुरस्कारांद्वारे राज्यातील नाविन्यपूर्ण, तंत्रज्ञानाभिमुख, निर्यातक्षम आणि प्रगत MSME उद्योगांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. परिषदेसाठी सर्व MSME उद्योजकांना https://mahamsmeawards.in/summit/ या वेबसाईटवर मोफत नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून जास्तीत जास्त उद्योजकांनी नोंदणी करून सहभाग नोंदवावा. तसेच MSSIDC संकेतस्थळ https://mssidc.maharashtra.gov.in/home/index तसेच ७७१००००९४४ / ७७१००००९५४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी केले आहे.



## बेस्ट कर्मचाऱ्यांची प्रलंबित ग्रॅच्युईटीची रक्कम याच आर्थिक वर्षात अदा करावी : एकनाथ शिंदे यांचे निर्देश

■ मुंबई (दै. संध्या)

**■ बेस्ट सक्षमीकरण आणि कर्मचारी मागण्यांच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या बैठकीत निर्णय**

बेस्ट उपक्रमाच्या सक्षमीकरणासाठी आणि कर्मचाऱ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आले आहेत. या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत संप मागे घेण्यात आल्याचा निर्णय कृती समितीने जाहीर केले. कर्मचाऱ्यांची प्रलंबित ग्रॅच्युईटीची रक्कम याच आर्थिक वर्षात अदा करण्याचा तसेच नवीन वेतन करार होईपर्यंत कर्मचाऱ्यांना अंतरिम दिलासा म्हणून बेस्टच्या कर्मचाऱ्यांना ३००० रुपये आणि वेटलिजवरील कर्मचाऱ्यांना २००० रुपये मासिक हंगामी वाढ देण्याचे मान्य करण्यात आले. सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. या बैठकीस परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सचिन अहिर, आमदार मुरजी पटेल, उपमुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नविन सोना, मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, बेस्टच्या महाव्यवस्थापक सोनिया सेठी, तसेच बेस्ट कर्मचारी कृती समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. बेस्ट बस सेवा तात्काळ सुरू करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले. कर्मचाऱ्यांची प्रलंबित ग्रॅच्युईटीची रक्कम याच आर्थिक वर्षात अदा करण्यात यावी. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी पुढील तीन वर्षांत ५००० नवीन बसेस स्वतःच्या मालकीच्या घेण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद नियोजित पद्धतीने करण्याचे निर्देश यावेळी दिले. याशिवाय, नवीन वेतन करार होईपर्यंत कर्मचाऱ्यांना अंतरिम दिलासा म्हणून बेस्टच्या कर्मचाऱ्यांना ३००० रुपये आणि वेटलिजवरील कर्मचाऱ्यांना २००० रुपये मासिक हंगामी वाढ देण्याचे मान्य करण्यात आले आहे. बेस्ट प्रशासनाने तयार केलेला 'कायापालट' प्रस्ताव तातडीने शासनास सादर करून त्यास मंत्रिमंडळाची मान्यता घेतली जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी दिली. बेस्ट ही मुंबईकरांची लाईफलाईन असून, ती सक्षम करणे आवश्यक असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## गोंदिया जिल्ह्यातील कृषी विकासाच्या सर्व प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

■ मुंबई (दै. संध्या)

गोंदिया जिल्ह्यात नवीन शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करणे, शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते आणि आधुनिक कृषी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध असून गोंदिया जिल्ह्यातील कृषी विकासाच्या सर्व प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

गोंदिया जिल्ह्यातील नवीन शासकीय कृषी महाविद्यालयाला मंजुरी देण्याबाबत मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत कृषी मंत्री बोलत होते.यावेळी या बैठकीला गोंदियाचे आमदार विनोद अग्रवाल, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग आणि कृषी आयुक्त सूरज मांढरे प्रामुख्याने उपस्थित होते.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, कृषी विभागाच्या जमीन वापराचे धोरण ठरवावे लागेल. गोंदिया येथे नवीन शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या स्तरावर प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच करंजा येथील तालुका बियाणे गुणन केंद्राच्या परिसरात विविध पिकांचे प्रात्यक्षिक प्लॉट विकसित करून पुढील काळात कृषी उद्यान उभारण्याची योजना आहे. कृषी अधिकाऱ्यांना वाहन उपलब्धतेसाठी कृषी विभागाने कार्यवाही करावी.माती परिक्षण प्रयोगशाळेसाठी आकृतीबंध मंजूर झालेला आहे.

करंजा येथील कृषी विभागाच्या जागेवर



विविध कार्यालये, प्रयोगशाळा व शेतकरी प्रशिक्षण केंद्रासाठी आवश्यक इमारतींच्या बांधकामाचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर करण्यात आला असून, जमिनीच्या मोजणीची प्रक्रिया सुरू आहे.जिल्ह्यातील कृषी विभागाच्या तीन प्रमुख प्रक्षेत्रांभोवती संरक्षणात्मक कुंपण उभारण्याचा प्रस्ताव विभागीय कृषी सहसंचालक, नागपूर विभाग यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. पुढे बोलताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, कृषी विभागामार्फत यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत आतापर्यंत २ हजार ७४७ लाभार्थ्यांना २६.५७ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. उर्वरित लाभार्थ्यांच्या सुमारे १३.६९ कोटी रुपयांच्या अनुदान मागणीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे.क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या कामकाजासाठी आवश्यक वाहनांची उपलब्धता, तसेच सिमकार्ड, मोबाईल, टॅब आणि लॅपटॉप वितरणासंदर्भातील प्रलंबित बाबींचा आढावाही बैठकीत घेण्यात आला. लॅपटॉप वितरणाची प्रक्रिया लवकरच पूर्ण केली जाणार असल्याचे सांगण्यात आले.माती परीक्षण प्रयोगशाळा, करंजा येथे मंजूर प्रयोगशाळा सुरू असली तरी आवश्यक मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे अडचणी येत आहेत. कृषी विभागाच्या नव्या आकृतिबंधानुसार कर्मचारी मंजुरीसाठी शासन स्तरावर कार्यवाही सुरू करण्यात येईल असे कृषी मंत्र्यांनी स्पष्ट केले. खतांच्या विक्रीतील अनियमितता रोखण्यासाठी २० मे २०२६ रोजीच्या परिपत्रकांच्या निर्देशांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश कृषीमंत्र्यांनी दिले, आतापर्यंत ६० कृषी केंद्रांची तपासणी करण्यात आली असून ५ खत विक्रेत्यांचे परवाने रद्द, २२ परवाने निलंबित करण्यात आले आहेत. एका कृषी केंद्राविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला असून, युरिया खताच्या जास्त दराने विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई सुरू आहे.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यातील युरिया खत विक्रीच्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर २२ जून २०२६ अखेर १२,२२४ खत विक्रेत्यांची तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी १,१९२ विक्रेत्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या असून ५५ विक्रेत्यांचे परवाने रद्द व ८३३ विक्रेत्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तसेच २१ ठिकाणी पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहितीही कृषिमंत्र्यांनी दिली.

## आदरणीय प्रा. बी. टी. भाऊ...
## विधानपरिषदेतील दृढनिश्चयी भगीरथ !

■ मुंबई (दै. संध्या)

■ निलेश मदाने ■
जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
मा. सभापती महोदयांचे जनसंपर्क अधिकारी
संचालक वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र

विधानपरिषद या ज्येष्ठांच्या सभागृहात पदवीधर मतदार संघातून सलग पाच वेळा म्हणजे सन 1980 ते सन 2010 पर्यंत असे तीस वर्ष सदस्य म्हणून अतुलनीय योगदान दिलेले आदरणीय प्रा. बी. टी. देशमुख सर यांचे निधन म्हणजे एका भगीरथाच्या अविरत संघर्षपर्वाची अखेर आहे. ते महाराष्ट्र विधानपरिषदेचे 19 ते 24 जुलै, 1998 अल्पकाळ अस्थायी सभापती (Pro-tem Chairman) होते. सन 1980 ते 1986 विदर्भ पदवीधर मतदारसंघ आणि त्यानंतर अमरावती पदवीधर मतदारसंघ ही त्यांची ओळख कायम राहिली. क्रिकेटच्या परिभाषेत सांगायचे झाले तर आक्रमक क्षेत्ररक्षण व्युहरचनेत फलंदाजाच्या अगदी समोर "फॉरवर्ड शॉर्टलेग" ची जागा असते. फलंदाज कितीही निष्णात असला तरी तो येथील चपळ क्षेत्ररक्षकामुळे मनोवैज्ञानिक दबावाखाली येतोच येतो... बी. टी. भाऊंचे विधानपरिषदेमधील आसन म्हणजे मंत्र्यांच्या दृष्टीने अगदी फॉरवर्ड शॉर्टलेगच ! बी. टी. भाऊ, सुरेश पाटील, प. म. पाटील, व्ही. यु. डायगव्हाणे या मंडळींनी भल्या भल्या मंत्र्यांना या फॉरवर्ड शॉर्टलेग वरुन लोकहिताच्या प्रश्नांसाठी जेरीस आणले, अनुकूल उत्तर - आश्वासन पदरात पाडून घेतले. आक्रमक विरोधी पक्षनेते श्री. नितीनजी गडकरी, श्री. पांडुरंग फुंडकर यांची साथ देखील महत्वाची ठरायची... सभागृह दणाणून सोडणे म्हणजे काय, याचा प्रत्यय त्यावेळी वार्ताहर गॅलरीने अगदी जवळून घेतला आहे.

रथ-दांडेकर समितीचा अहवाल, विदर्भातील विकासाचा अनुशेष, तो दूर व्हावा यासाठी तातडीने काय काय उपाय योजना करायला हव्यात, वैधानिक विकास महामंडळ स्थापनेची आवश्यकता, अमरावतीचा पाणी प्रश्न, शिक्षकांचे प्रश्न आणि ते सोडविण्यासाठी आवश्यक असलेली संघटना बांधणी, शेतकरी आत्महत्या अशा साऱ्या गोष्टींसाठी बी. टी. भाऊंनी विधानपरिषद सदस्यत्वाच्या माध्यमातून केलेला संघर्ष विलक्षण आहे. या संघर्षाचे स्वरुप अनेकदा विकासाच्या वाटेवरील सधन-समृध्द पश्चिम महाराष्ट्र विरुध्द अनुशेषग्रस्त विदर्भ अशा वळणावर गेल्याचे सभागृहाने अनुभवले. सन 1999 ते 2008 या कालावधीत ज्येष्ठ नेते श्री. जयंत पाटील हे राज्याचे वित्तमंत्री होते. या काळात सभागृहात बी. टी. भाऊंनी सर्व उपलब्ध संसदीय आयुधांचा पर्याप्त वापर करीत वेळ प्रसंगी शासनाला धारेवर धरत अनुशेष निवारणार्थ संसाधनाच्या समन्यायी वाटपासाठी दिलेला लढा ऐतिहासिक ठरावा असाच आहे. सभापती महोदय, मंत्री महोदय असं कसं सांगताहेत... अशी हरकत घेत पुढे अतिशय आक्रमकपणे ते आपले मुद्दे मांडत... एका प्रसंगी नागपूर अधिवेशन काळात वित्तमंत्री श्री. जयंत पाटील यांच्याशी त्यांची सभागृहात चकमक



झडली. दुसऱ्या दिवशी प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना नागपूरच्या रूग्णालयात दाखल व्हावे लागले. वित्तमंत्री श्री. जयंत पाटील साहेब तातडीने त्यांची विचारपूस करण्यासाठी रूग्णालयात पोहचले. टोकाचे मतभेद असले तरी मनभेद नसावेत, महाराष्ट्राच्या सुसंस्कृत राजकीय परंपरेचे हे महत्वाचे उदाहरण.

विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह सर्व राज्यांमध्ये नाही. या सभागृहाला काळाच्या ओघात वरिष्ठ सभागृह, ज्येष्ठांचे सभागृह, विद्वतजनांचे सभागृह, पुनर्विलोकन सभागृह (Revising Chamber) ही नामाभिदाने प्राप्त झालेली आहेत. ही नामाभिदाने किती यथार्थ आहेत त्याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे बी. टी. भाऊ. सिंचनासह विदर्भाच्या अनुशेषासंदर्भात आवाज उठवत असतांना त्यांनी सुचविलेल्या उपाययोजना पुढील काळासाठीचे यथायोग्य दिशादर्शक देखील आहेत.

बी. टी. भाऊंच्या विनियोजन विधेयक शिफारशीमुळे अर्थसंकल्पीय अधिवेशन मार्च - एप्रिल 2003 दरम्यान घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाला होता. त्यामुळे अधिवेशनाचे सुप वाजल्यावर पुन्हा विधानसभेचे एक दिवसाचे अधिवेशन बोलवावे लागले. विनियोजन विधेयक विधानसभेने संमत करुन विधानपरिषदेकडे विचारार्थ पाठविले. विधानपरिषदेकडे ते आल्यावर बी. टी. भाऊंनी त्यास अनुशेषाच्या संदर्भात शिफारस केली आणि ती विधानपरिषद सभागृहाने संमत केली. त्यामुळे या शिफारशीसह हे विधेयक पुन्हा विधानसभेकडे पाठविण्यात आले, मात्र अधिवेशनाचा अखेरचा दिवस असल्याने शिफारशीसह विनियोजन विधेयक विधानसभेला प्राप्त झाले त्यावेळी विधानसभेचे अधिवेशनाचे कामकाज संस्थगित झाले होते. विनियोजन विधेयक शिफारशीसह मंजूर होण्यासाठी विधानसभेचे एक दिवसाचे अधिवेशन दिनांक 08 मे, 2003 रोजी पुन्हा बोलवावे लागले होते. महाराष्ट्र विधिमंडळाच्या वाटचालीतील बी. टी. भाऊंशी जोडला गेलेला हा प्रसंग वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे.

राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा (CPA MAHARASHTRA BRANCH) ही देशातील पहिली शाखा आहे. सन्माननीय सदस्यांसाठी तसेच राज्यशास्त्र - लोकप्रशासन शाखेच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संसदीय अभ्यासवर्ग, परदेश अभ्यास दौरे आणि विविध प्रबोधनात्मक उपक्रम विधानमंडळातील या संस्थेद्वारे राबविले जातात. राज्यशास्त्राचे प्राध्यापक असलेल्या बी. टी. भाऊंचे सीपीएशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. नागपूर अधिवेशन काळात सीपीए अभ्यासवर्गामध्ये दुपारच्या अनौपचारिक सत्रात बी. टी. भाऊंचा विद्यार्थ्यांबरोबर होणारा संवाद म्हणजे चिरंतन प्रेरक अनुभूती होय. सरकारकडून सीपीएला अनुदानापोटी प्राप्त झालेला फंड संस्थेचा खर्च भागविण्यासाठी मुदत ठेवीमध्ये गुंतविण्यात आला होता, काही तांत्रिक बाबी आणि महालेखाकारांची भूमिका यामुळे हा निधी परत जाण्याची शक्यता होती. यासंदर्भात तत्कालीन सभापती श्री. शिवाजीराव देशमुख यांनी सीपीए कार्यकारिणीची बैठक महालेखाकार, वित्त सचिवांसह बोलावली. प्रा. श्री. बी. टी. देशमुख सरांनी आपले सर्व कौशल्य आणि अनुभव पणाला लाऊन बिनतोड युक्तीवाद करत हा निधी परत जाण्यापासून रोखला, ज्या ठेवीच्या व्याजावर पुढे सीपीए लंडन मुख्यालय शुल्क, आशिया विभाग शुल्क आणि अभ्यास वर्गासारख्या विविध उपक्रमांचा खर्च भागविण्यात आला...

तपस्वी जीवनशैली, अढळ तत्वनिष्ठा, अविरत सेवाभाव यांचा मापदंड मागे ठेवत आदरणीय बी. टी. भाऊ या आचार्याने शुक्रवार, दिनांक 19 जून, 2026 च्या रात्री निजधामाकडे प्रस्थान ठेवले. मुख्यमंत्री महोदयांनी शोकभावना व्यक्त करतांना एक पर्व संपले... असे म्हंटले ते अगदी खरे आहे.

देखणी ती जीवने जी तृप्तीची तीर्थोदके
चांदणे ज्यातून फाके शुभ्र पाऱ्यासारखे...

कविवर्य बा. भ. बोरकर यांच्या या काव्यपंक्ती बी. टी. भाऊंचे स्मरण करतांना डोळ्यासमोर येतात. अस्वस्थ वर्तमानाच्या संदर्भात अशा दृढनिश्चयी भगीरथाचे आपल्यात नसणे वेदनादायी आहे. आम्हां राज्यशास्त्र विद्यार्थ्यांना सॉक्रेटिस - प्लेटो - ॲरिस्टॉटल शिकविणारे प्रा. बी. टी. देशमुख सर "तत्वज्ञ राजा"च्या भूमिकेत मात्र आमच्या हृदयात सदैव विराजमान राहतील.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जुन्नर तालुक्यात पावसाची जोरदार हजेरी

जुन्नर (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील लेण्याद्री गोळेगाव कुमशेत व पांगरी माथा आदी परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली असून ढगफुटी सदृश्य पावसामुळे ओढ्या नाल्यांना पहिल्याच पावसात पाणीच पाणी झाले. सकाळपासूनच उन्हाचा तडाखा जाणवत होता दुपारी अचानक ढग दाटून आले व विजेच्या कडकटासह मुसळधार पावसाने जुन्नर तालुक्यात जोरदार आगमन केले. लेण्याद्री ओझर फाटा परिसरात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला त्यामुळे परिसरातील शेतांमध्ये पाणीच पाणी दिसत होते. तर ओढ्यांना व नाल्यांना पुराचे स्वरूप आले होते. अचानक आलेल्या पावसामुळे सर्वांची तारांबळ उडाली परंतु बळीराजा मात्र सुखावला असून कडाक्याच्या उन्हापासून नागरिकांची पावसामुळे सुटका झाली.

### विनापरवाना लाकूड वाहतूक करणारा टेम्पो जप्त : वनपरिक्षेत्र अधिकारी व अश्विनी शिंदे

■ बारामती वनविभागाची धडक कारवाई

बारामती (दैनिक संध्या) : मौजे रुई गावच्या हद्दीत बारामती-भिगवण रोडकडून बारामती एमआयडीसी परिसराकडे जाणाऱ्या रस्त्यावर धडक कारवाई करुन विनापरवाना लाकूड वाहतूक करणारा टेम्पो जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी व अश्विनी शिंदे यांनी दिली आहे. पारवडीचे वनरक्षक संतोष जराड व हंगामी रोजंदारी मजूर यांच्या पथकाला टाटा कंपनीचा पांढऱ्या क्रीम रंगाचा एक टेम्पो संशयास्पदरित्या आढळून आले ; चौकशी केली असता टेम्पोमध्ये कडूनिंब व जांभूळ वृक्ष प्रजातीचे विनापरवाना तोडलेले अंदाजे ८ ते ९ टन मुद्देमाल विना वाहतूक परवाना वाहतूक करत असल्याचे आढळून आले. मुद्देमालसह टेम्पो पुढील चौकशीकरिता वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाच्या आवारात जमा करण्यात आले. वाहन चालक फरार झाला असून वाहन चालक व मालक यांच्याविरुद्ध भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४१,४२ व ५२ (१) अन्वये वनगुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक वनसंरक्षक अतुल जैनक यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी अश्विनी शिंदे, वनपाल एस.आर. उंडे, संतोष जराड वनरक्षक करीत आहे.



### चाकणमधील नालेसफाईची कामे पूर्णत्वाकडे

चाकण (दैनिक संध्या) : चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे यांच्या सूचनेनुसार व नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली चाकण शहरात सुरू असलेली नालेसफाईची कामे पूर्णत्वाकडे आली आहेत. पावसाळ्यात पाण्याचा निचरा सुरळीत व्हावा व नागरिकांना पाणी साचणे, पूरस्थिती किंवा अस्वच्छतेचा त्रास होऊ नये यासाठी चाकण नगरपरिषदे मार्फत नगरपरिषद हद्दीतील ओढे व नाल्यांची साफसफाई सुरू आहे. यामध्ये प्राथमिक शाळेजवळ, पोलीस ठाण्याजवळचा ओढा, मुटकेवाडी ओढा, राणुबाईमळा ओढा, माळआळी ओढा, देशमुख आळी जवळील ओढा तसेच इतर नाले व शहरातील भूमिगत गटर, चेंबर साफसफाई करण्यात आली आहे. अंतर्गत गाळ काढणे व सार्वजनिक ठिकाणचा कचरा उचलणे आदी कामे प्रगतीपथावर आहेत. पावसाळ्यात पाण्याच्या प्रवाहास अडथळे निर्माण करणारे दगड, गाळ, प्लास्टिक, झुडपांचा कचरा काढण्यात आला आहे. चाकण नगरपरिषद हद्दीतील सर्व परिसर स्वच्छ व सर्वांग सुंदर ठेवण्याचे तसेच नाल्यांमध्ये कचरा टाकू नये, असे आवाहन चाकण नगरपरिषदेच्या वतीने नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, नगरसेविका रूपाली कांडगे व नगरसेवक मंगेश कांडगे आदींनी केले आहे.

## दहा मॉडेल शाळांची जिल्हा परिषद सदस्या रुपाली झेंडे यांच्याकडुन पाहणी



पुरंदर (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील दिवे-गराडे जिल्हा परिषद गटातील मॉडेल स्कूल म्हणून निवड झालेल्या दहा जिल्हा परिषद शाळांची पाहणी नुकतीच करण्यात आली. या पाहणी दौऱ्यात शाळांमधील भौतिक सुविधा, शैक्षणिक वातावरण, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सोयी-सुविधा तसेच आवश्यक विकासकामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद सदस्या रूपाली झेंडे, गटविकास अधिकारी अविनाश थोरात,गटशिक्षण अधिकारी भामने, बांधकाम विभागाचे अभियंता संतोष नलवडे, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, ग्रामस्थ तसेच संबंधित शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. पाहणीदरम्यान शाळांच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध कामांबाबत चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबत आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मॉडेल स्कूल उपक्रम महत्त्वाचा ठरणार असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले.

शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक त्या सुविधा आणि विकासकामांना प्राधान्य दिले जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## ओतूर परिसरातील अपघातात बाप लेकीचा मृत्यू

नारायणगाव (दै. संध्या)



जुन्नर तालुक्यातील नगर-कल्याण महामार्गावर ओतूर येथील निमंत्रण हॉटेलजवळ रविवारी दि. २१ दुपारी १२.१६ च्या सुमारास एक भीषण अपघात घडला. या अपघातात एका पित्याचा आणि त्यांच्या ३ वर्षांच्या मुलीचा जागीच मृत्यू झाला आहे. आळेफाटा येथून कल्याणच्या दिशेने जाणारी मोटारसायकल (MH 17 DD 3215) आणि कल्याणहून आळेफाट्याकडे येणारा आयशर ट्रक (MH 04 MR 8867) यांच्यात समोरासमोर जोरदार धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की मोटारसायकलवरील पाचही जण १० ते १५ फूट दूरवर फेकले गेले. या संपूर्ण घटनेचे थरारक दृश्य परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहे. या दुर्घटनेत अजय बबन दुधवडे वय २१ वर्षे आणि त्यांची ३ वर्षांची मुलगी अनुजा अजय दुधवडे रा. माळवंदवाडी, घारगाव, जि. अहिल्यानगर यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात सलोनी अजय दुधवडे, तनुजा अजय दुधवडे आणि सुदर्शन गौतम केदार हे तिघे जखमी झाले असून, त्यांच्यावर आळेफाटा येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघाताची माहिती मिळताच ओतूर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. रस्ते मोकळे करून वाहतूक सुरळीत करण्यात आली असून, ओतूर पोलीस ठाण्यात या अपघाताची नोंद करण्यात आली आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## शिवाजी नऱ्हे यांची पोलिस उपनिरीक्षक पदावर निवड

राजगुरुनगर (दै. संध्या)



खेड पोलिस ठाणे अंतर्गत वाहतूक शाखेत कार्यरत असलेले सहाय्यक पोलिस फौजदार शिवाजी लक्ष्मण नऱ्हे यांची पोलिस उपनिरीक्षक (PSI) पदावर पदोन्नती झाली आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पोलिस विभागासह विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कर्तव्यदक्ष आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळख असलेले शिवाजी नऱ्हे हे सर्वसामान्य नागरिकांमध्ये ही लोकप्रिय राहिले आहे.१९९५ च्या बॅच मध्ये महाराष्ट्र पोलिस दलात रुजू होऊन त्यांनी ठाणे, राजगुरुनगर, चाकण तसेच जिल्हा वाहतूक शाखेत वाहतूक पोलिस म्हणून उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. सध्या ते महाराष्ट्र सुरक्षा पथकांतर्गत महामार्ग पोलिस विभाग, आळेफाटा येथे कार्यरत आहेत.

शिवाजी नऱ्हे यांनी आपल्या सेवाकाळात वाहतूक नियोजन, अपघात प्रतिबंधक उपाययोजना तसेच नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती करण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि उत्कृष्ट कार्यशैलीमुळे त्यांनी वरिष्ठ अधिकारी तसेच नागरिकांचा विश्वास संपादन केला आहे.

त्यांच्या उत्कृष्ट सेवेमुळे त्यांना विविध सामाजिक संस्था, संघटना आणि प्रशासकीय स्तरावर अनेक वेळा गौरव करण्यात आला आहे. त्यांच्या दीर्घ सेवेला आणि कार्यक्षमतेला मिळालेली ही पावती असल्याची भावना सहकारी आणि नागरिकांनी व्यक्त केली आहे. पोलिस उपनिरीक्षक पदावर निवड झाल्यानंतर नऱ्हे यांना त्यांच्या सहकारी अधिकारी, आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या आहेत.

या यशाबद्दल शिवाजी नऱ्हे यांनी वरिष्ठ अधिकारी, सहकारी कर्मचारी आणि कुटुंबीयांचे आभार व्यक्त करत, भविष्यातही अधिक जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे सेवा बजावण्याचा निर्धार व्यक्त केला.

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून आर्वी शाळेत वृक्षारोपण




नारायणगाव (दै. संध्या)

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पुणे जिल्ह्याचे अध्यक्ष प्रभाकर बांगर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून जुन्नर तालुक्यात आर्वी आणि पिंपळगाव या दोन जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांना वह्या व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच शाळेच्या परिसरामध्ये वृक्ष लागवड करून पर्यावरण वाचवण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून ते जगविण्यासाठी प्रयत्न करावे असा संदेश देण्यात आला हा उपक्रम प्रमोद खांडगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आला. यावेळी दीपक गाढवे आर्वी गावचे सरपंच कुलदीपशेठ डोंगरे भरत गाढवे विनोद डोंगरे यांच्यासह शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

## पद्मश्री रघुवीर खेडकर यांचा सत्कार

नारायणगाव (दै. संध्या)

भारत देशाचा सर्वोच्च पद्मश्री पुरस्काराचे लोककलेचे प्रथम मानकरी रघुवीर खेडकर यांना राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यानिमित्ताने संगमनेर येथे राज्य पुरस्कार प्राप्त हलगी सम्राट केरबा पाटील संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महाराष्ट्र शासन समाजभूषण पुरस्कार्थी आणि आद्यगुरु लहुजी साळवे महाराष्ट्र शासन स्मारक समिती सदस्य प्रा.काशिनाथ आल्हाट यांच्या शुभहस्ते पद्मश्री रघुवीर खेडकर यांचा सत्कार करण्यात आला रघुवीर भाऊ खेडकर ही व्यक्ती तमाशा फड मालक म्हणून कधीही मोठेपणा मिरवत नाही. त्यांना भेटायला आलेल्या महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाला त्याच्या नावा गावासह ते ओळखत असतात. ही त्यांची खासियत आहे. तमाशा क्षेत्रात ज्याप्रमाणे त्यांच्या कलेचा आणि त्यांच्या वर्तनाचा दबदबा आहे. तसाच शासनाच्या दरबारी



त्यांचा आदर आहे. भारत देशामध्ये पहिल्यांदा तमाशा कलेला पद्मश्री पुरस्काराचा हा मानाचा तुरा प्राप्त झाला आहे. या पाठीमागे रघुवीर खेडकर यांची फार मोठी तपश्चर्या आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर विविध क्षेत्रात त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे. या पुरस्काराच्या माध्यमातून महाराष्ट्रातील लोककलावंतांच्या समस्या शासनाच्या दरबारी मांडून ते योग्य पद्धतीने न्याय देण्याचा निश्चित प्रयत्न करतील.

## प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे बालकांच्या जीवाला धोका

### अनेक तक्रारींनंतरही कारवाई नाही; धोकादायक आंब्याचे झाड हटविण्यास प्रशासनाचे दुर्लक्ष

नीरा (दै. संध्या)



नीरा (ता. पुरंदर) येथील प्रभाग क्रमांक १ मधील अंगणवाडी केंद्राशेजारी उभ्या असलेल्या धोकादायक आंब्याच्या झाडाकडे प्रशासनाने केलेल्या दुर्लक्षामुळे चिमुकल्या बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. वारंवार तक्रारी आणि पाठपुरावा करूनही संबंधित झाडावर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने पालक आणि नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा केंद्रालगत असलेल्या अंगणवाडी इमारतीच्या अगदी शेजारी हे मोठे आंब्याचे झाड उभे आहे. झाडाच्या अनेक फांद्या इमारतीच्या स्लॅबवर झुकल्या असून पावसाळ्यातील वादळी वारे आणि मुसळधार पावसामुळे झाड किंवा त्याच्या मोठ्या फांद्या कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत अंगणवाडी इमारतीचे नुकसान होण्याबरोबरच तेथे येणाऱ्या बालकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. अंगणवाडी सेविका विद्या मोटे यांनी या धोकादायक झाडाबाबत अनेक वेळा ग्रामपंचायत प्रशासनाकडे पाठपुरावा केला आहे. मात्र, संभाव्य धोका स्पष्टपणे समोर असतानाही प्रशासनाकडून कोणतीही प्रभावी कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, अंगणवाडीसारख्या संवेदनशील ठिकाणी लहान मुलांच्या सुरक्षेशी संबंधित प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी संबंधित झाडाची तातडीने छाटणी किंवा हटविण्याची कार्यवाही करणे आवश्यक असताना प्रशासनाकडून होत असलेला विलंब चिंताजनक असल्याचे नागरिकांनी सांगितले.

दरम्यान, या प्रकरणी प्रभारी गटविकास अधिकारी अविनाश थोरात यांनी ग्रामसेवकांकडून वस्तुस्थितीची माहिती घेऊन मुलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या जातील, तसेच संबंधित धोकादायक झाडाबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येतील, असे स्पष्ट केले आहे.

## विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला मंदार जगताप यांचा मदतीचा हात

### माहूर विद्यालयास मल्टीपर्पज हॉल वर्षभरात बांधून देणार : हरिभाऊ लोळे

काळदरी (दै. संध्या)




सामाजिक बांधिलकी जपत आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लावण्याच्या उद्देशाने मंदार निर्मला लक्ष्मण जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त जि. प. शाळा माहूर येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटपाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमाअंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, खोडरबर, शार्पनर आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना पौष्टिक खाऊ देऊन त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यात आला. वाढदिवसासारखा आनंदाचा दिवस सामाजिक कार्यातून साजरा करण्याचा आदर्श संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी विद्यालयातील विद्यार्थीनी आरोही शिंदे व प्रणाली जगताप यांनी या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त केला. शैक्षणिक साहित्यामुळे त्यांच्या अभ्यासाला मदत होणार असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

मंदार निर्मला लक्ष्मण जगताप यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी हा उपक्रम राबविला. समाजातील प्रत्येकाने वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस किंवा इतर आनंदाचे क्षण सामाजिक कार्यातून साजरे करावेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. शाळेचे मुख्याध्यापक श्री हनुमंत पवार यांनी या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या हितासाठी अशा प्रकारचे कार्यक्रम नियमितपणे आयोजित होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे यावे, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य केले. वाढदिवसाचे औचित्य साधून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सामाजिक जाणीव आणि शिक्षणाविषयीची बांधिलकी यांचे सुंदर उदाहरण या कार्यक्रमातून पाहायला मिळाले. माहूर माध्यमिक विद्यालय माहूर या विद्यालयासाठी एक मल्टीपर्पज हॉल बांधून देण्यासाठी विविध कंपन्यांच्या सी एस आर फंडातून व कमी पडल्यास ग्रामस्थांच्या मदतीने सहकार्य करून हॉल बांधून देऊ असे उद्गार श्री हरिभाऊ लोळे व शरदराव जगताप यांनी व्यक्त केले .

या कार्यक्रमाचे हे तिसरे वर्ष असून आतापर्यंत 1000 विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला असून माहूर आणि परिसरातील गोरगरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली आहे .विविध खेळांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या व यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक रूपाने बक्षीस दिली आहेत.

